म. ग्रं. सं. ठाणें
क्र. 3104
सं. 982.

# ोहन.

ग्रंथालय
म. ग्रं. सं. ठाणें.



REFBK-0003447
REFBK-0003447

पुणें शहर.
महाराष्ट्र पब्लिशिंग हाउस, लिमिटेड, पुणें.

सं.ग्रा.: ८३८
२७।६।२५

म. ग्रंथ संग्रहालय मं.
ग्रा. क्र. 3884
मुंबई शाखा

# काव्य-मोहन.

REFBK-0003447
REFBK-0003447

१९२८ चे स्कूल लीव्हिंग परीक्षेला नेमलेलें
मराठी कवितांच्या वेंच्यांचें पुस्तक.

# काव्य-मोहन.

मराठी … संग्रहालय ठाणे
दा. क्र. 34880

संपादक
कृष्णाजी गोविंद किनरे,
मराठीचे शिक्षक, न्यू. इं. स्कूल, पुणें.

---

प्रकाशक
महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, लिमिटेड, पुणें.

---

किंमत १२ आणे.

प्रकाशक—
विश्वनाथ गणेश ताम्हणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर
महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस लिमिटेड,
८१५ सदाशिव पेठ, पुणें.

( सर्व हक्क स्वाधीन. )

मुद्रक—
गोपाळ बळवंत जोशी.
आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणें.

# निवेदन.

'स्कूल लीव्हिंग' परीक्षेला मराठी 'दुसरी भाषा' म्हणून घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां हे मराठी कवितांचे वेंचे मुद्दाम काढिले. ते सन १९२८ सालीं होणाऱ्या परीक्षेला युनिव्हर्सिटीनें नेमून मूळ हेतूचें साफल्य केलें, याबद्दल आनंद व कृतज्ञता वाटते. प्राचीन व अर्वाचीन कवींची व कवितांची निवड करितांना मूळ हेतूकडे लक्ष देऊन युनिव्हर्सिटीच्या नियमांचा तोल अर्थात् संभाळावा लागला आहे. तथापि हे वेंचे रसिकांना मान्य होतील, व इतर विद्यार्थ्यांच्या चांगले उपयोगीं पडतील, अशी बळकट आशा आहे. ज्या विद्यमान कवींचे वेंचे यांत समाविष्ट झाले आहेत, त्यांना आपली कृति तरुण पिढीच्या शिक्षणाला उपयोगीं पडली, याबद्दल आनंद वाटेल, यांत शंका नाहीं. त्यांचा मी आभारी आहें.

पुणें, ता. १।६।२७.

संपादक.

# आभार व सहानुभूति.

'काव्य-मोहन' पुस्तक स्कूल लीव्हिंग परीक्षेला मंजूर करून घेतांना काय अडचणी आल्या त्या इतिहासापेक्षां तें मंजूर झाल्यानें आमच्या 'लिमिटेड' कंपनीला कसा शुभ शकुन झाला आहे याच गोष्टीचें अधिक महत्त्व आहे. देशी प्रकाशकापेक्षां विदेशी प्रकाशक बरा, देशी लेखकापेक्षां विदेशी लेखक बरा, हे अनुभव उगाळण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. आपण आहों ते चांगले आहों, चांगले नसलों तर चांगले झालें पाहिजे. आम्ही चांगले होणार हाच निदिध्यास आमचे पुढें पाहिजे आहे. आम्ही वाईट, आमचे लोक वाईट, हा जप आतां सुशिक्षितांनीं तरी टाकून द्यावा.

सदर पुस्तकाचे बाबतींत ज्या अनेक सद्भावी मित्रांची मदत आम्हांस झाली त्यांचे अत्यंत आभारी आहों. आम्हांस मदत व सहानुभूति पाहिजे. **निदान दहा रुपयांचा एक भाग घेऊन** प्रत्येक महाराष्ट्रीयानें आम्हांस मदत करणें जरूर आहे.

ता. १-६-२७.

वि. ग. ताम्हणकर,

मॅनेजिंग डायरेक्टर,

महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, लिमिटेड, पुणें.

# अनुक्रमणिका.

## विभाग १ ला.


| प्रकरण. | पृष्ठ. |
|---|---|
| **ज्ञानेश्वर** | |
| १ सज्जनप्रार्थना ... ... ... | २ |
| **तुकाराम** | |
| २ स्फुट अभंग ... ... ... | ५ |
| **वामनपंडित** | |
| ३ भरत व वसिष्ठ ... ... ... | ९ |
| **रामदास** | |
| ४ स्फुट अभंग ... ... ... | १३ |
| **सामराज** | |
| ५ मनास बोध ... ... ... | १५ |


## विभाग २ रा.


| | |
|---|---|
| **मुक्तेश्वर** | |
| ६ व्यवहार सात्विक भाव ... ... ... | २० |
| **मोरोपंत** | |
| ७ अंबरीषाख्यान ... ... ... | २५ |
| **श्रीधर** | |
| ८ दृष्टि तशी सृष्टि ... ... ... | ३६ |
| **वा. वा. खरे** | |
| ९ जन्मभूमि ... ... ... | ३८ |

| प्रकरण | पृष्ठ. |
|---|---|
| **नर. वा. टिळक** | |
| १० एक सुंदर कवि ... ... ... | ४१ |
| **केशवसुत** | |
| ११ कांक्यांवांचुनि गुलाब नाहीं ... ... | ४२ |
| **गोविंदाग्रज** | |
| १२ मंगलाचरण ... ... ... | ४३ |
| **चंद्रशेखर** | |
| १३ स्नेहाची थोरवी ... ... ... | ४५ |
| **भा. रा. तांबे** | |
| १४ गुराख्याचें गाणें ... ... ... | ५० |
| **न. चिं. केळकर.** | |
| १५ झिं झिं पाऊस ! ... ... ... | ५३ |
| **साधुदास** | |
| १६ लक्ष्मणपरीक्षा ... ... ... | ५५ |
| **माधव ज्यूलियन** | |
| १७ आमुची मायबोली ... ... ... | ६१ |

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणें.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. 35080
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. 2369 6526
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक नं. 63
ता. 24.6.1926
ठाणे

# काव्यमोहन.

## विभाग पहिला.

### १.

### ज्ञानेश्वर.

पैठणाजवळच्या आपें नांवाच्या गांवीं गोविंदपंत म्हणून एक कुळकर्णी होता. त्याचा मुलगा विठ्ठलपंत. विठ्ठलपंताच्या बायकोचें नांव रखमाबाई. ही आळंदीच्या कुळकर्ण्याची मुलगी. या जोडप्याच्या पोटीं ज्ञानेश्वराचा आळंदीस शके ११९७ त जन्म झाला. याला निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताबाई अशीं भावंडें होतीं. हीं चारही भावंडें लहानपणापासून अत्यंत विरक्त, विठ्ठलभक्त व ज्ञानी होतीं. ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरी या नांवानें प्रसिद्ध असलेली गीतेवरील टीका, अमृतानुभव व पांसष्टी असे मुख्य ग्रंथ ओंवीबद्ध केले असून पुष्कळ भक्तिपर, वैराग्यपर व ज्ञानपर असे उत्कृष्ट अभंगही केले आहेत याची वाणी अत्यंत सुरस असून उपमा, रूपकें, दृष्टांत इत्यादि अलंकारांनीं अगदीं फुललेली आहे. भाषा जुनी असल्यामुळें नवीन वाचकाला अर्थबोध जरी होत नाहीं, तरी शब्दबोध झाल्यानंतर अर्थगांभीर्यानें वाचकाची मान डुलल्यावांचून राहात नाहीं. असे सुंदर ग्रंथ २१ वर्षांच्या वयाच्या आंत निर्माण झालेले पाहून कोणालाही कौतुकच वाटेल. ज्ञानेश्वर शके १२१८ त आळंदीसच समाधिस्थ झाला.

## सज्जनप्रार्थना.

( ज्ञानेश्वरी अध्याय १ ला. )

जैसें शारदीचिये[1] चंद्रकळे[2] । माजीं अमृतकण कोंवळे
ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें[3] १
तियांपरी श्रोता । अनुभवावी हे कथा[4]
अति हळुवारपण[5] चित्ता । आणुनिया २
हे शब्देंवीण संवादिजे[6] । इंद्रियां नेणतां भोगिजे[7]
बोला-आदीं झोंबिजे[8] । प्रमेयांसी[9] ३
जैसे भ्रमर पराग नेती । परी कमळदळें[10] नेणती
तैसी परी आहे सेवितीं[11] । ग्रंथीं इये ४
कां आपुला ठावो न सांडितां । आलिंगिजे चंद्र प्रकटतां
हा अनुराग[12] भोगितां । कुमुदिनी[13] जाणे ५
ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि[14] अंतःकरणें
आथिला[15] तोचि जाणे । मानूं[16] इये ६
अहो अर्जुनाचिये पांती[17] । जे परिसणया[18] योग्य होती
तिहा कृपा करूनि संतीं । अवधान द्यावें ७
हें सलगी[19] म्यां म्हणितलें । चरणां लागोनि विनविलें
प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणऊनिया ८

---

१ शरदृतूच्या. २ द्वितीयेच्या चंद्राच्या चांदण्यांत. ३ चकोरपक्ष्यांचीं पिलें. ४ भगवद्गीता. ५ मृदुपणा, कोमलपणा. ६ बोलावा, विवेचावा, विचार करावा. ७ अनुभवावी. ८ बिलगावें, ग्रहण करावें. ९ रहस्य, तात्पर्य. १० कमलाच्या पाकळ्या ११ सेवनांत. १२ प्रेम. १३ कमलिनी. १४ स्थिर. १५ असलेला, सुसंपन्न १६ खुबी, रहस्य. १७ पंक्तीला, बरोबरीला. १८ श्रवणाला. १९ लडिवाळपणें, प्रेमानें लगट करून.

जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा
तरी अधिक तयाचा । संतोष आथी[1] ९
तैसा तुम्हीं मी अंगीकारिला । सज्जनीं आपुला म्हणितला
तरी उणें सहजें उपसाहेला[2] । प्रार्थूं काई १०
परी अपराध तो आणीक आहे । जे मी गीतार्थ कवळूं[3] पाहें
ते अवधारा विनवूं लाहें[4] । म्हणऊनिया ११
हें अनावर[5] न विचारितां । वायांचि धिंवसा[6] उपनला[7] चित्ता
येऱ्हवीं काय भानुतेजीं खद्योता । शोभा आथी १२
कीं टिटिभू[8] चांचूवरी[9] । माप सूये[10] सागरीं
मी नेणतु त्यापरी । प्रवर्तें येथ १३
आयका आकाश गिंवसावें[11] । तरी आणीक त्याहुनि थोर होआवें
म्हणऊनि अपाड[12] हें आघवें[13] । निर्धारितां[14] १४
तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी[15]
जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोनी १५
तेथ हरु म्हणे नेणिजे । देवी जैसें कां स्वरूप तुझें
तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व १६
हा वेदार्थसागरु । जया निद्रिताचा घोरु[16]
तो स्वयें श्रीसर्वेश्वरु । प्रत्यक्ष अनुवादला[17] १७
ऐसें जें अगाध । जेथ वेडावती[18] वेद
तेथ अल्प मी मतिमंद । काय होय १८

---

१ आहे, असतो. २ सहन कराल, पोटांत घालाल. ३ स्पष्ट करूं. ४ पहातों, लागतों, तयार होतों. ५ झेंपण्यास कठिण. ६ धैर्य, उत्साह. ७ उपजला. ८ टिटवी. ९ चोंचीनें. १० घाली. ११ कवटाळावें. १२ अगाध, गहन, कठिण. १३ सर्व. १४ वास्तविक पाहतां. १५ स्पष्ट करून सांगे. १६ घोरणें. १७ बोलला. १८ कुंठित होतात.

हें अपार कैसेनि कवळावें[1] । महातेज कवणें धवळावें[2]
गगन मुठी सुवावें[3] । मशकें[4] केवीं १९
परी एथ असे एक आधारु । तेणेंच बोलें मी संधरु[5]
जैं सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेव म्हणे २०
एरवीं तरी मी मूर्खु । जरी जाहला अविवेकु
तरी संतकृपादीपकु । सोज्वळ[6] असे २१
लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे
का मृतही जीवित लाहे[7] । अमृतसिद्धि[8] २२
जरी प्रगटे सिद्ध[9]सरस्वती । तरी मुकया आंथी[10] भारती[11]
एथ वस्तुसामर्थ्यशक्ती[12] । नवल कायी २३
कां जयातें कामधेनु माये । तयासी अप्राप्य कांहीं आहे
म्हणऊनि मी प्रवर्तों लाहें । ग्रंथीं इये २४
तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें
करूनि घ्यावें हें तुमतें । विनवीत असें २५
आतां देइजे अवधान । तुम्हीं बोलविला मी बोलेन
जैसें चेष्टे[14] सूत्राधीन[15] । दारुयंत्र[16] २६
तैसा मी अनुगृहीतु[17] । साधूंचा निरूपितु[18]
ते आपला अलंकारितु । भलतेयापरी[19] २७

---

१ आकळावें, उकलावें. २ उजळावें. ३ धरावें, घालावें. ४ चिलटानें. ५ धिटाईनें. ६ लखलखीत. ७ पावतो. ८ अमृतप्रभाव. ९ प्रसन्न. १० येते, फुटते. ११ वाचा, वाणी. १२ वस्तुमाहात्म्याचा प्रभाव. १३ दूर, बाजूला. १४ व्यापार करितें. १५ सूत्रबद्ध. १६ लांकडी बाहुलें, कळसूत्री बाहुलें. १७ कृपेंतला. १८ आज्ञांकित. १९ हवा तसा, इच्छेप्रमाणें.

२.

# तुकाराम.

पुण्याजवळ देहू या नांवाचें एक गांव आहे. तें तुकारामाचें मूळ ठिकाण. याचा बाप जातीचा शूद्र असून तो वाण्याचा धंदा करीत असे. तुकारामाच्या कुळांत विठ्ठलाची भक्ति परंपरागत होती. त्यांत आणखी त्याच्यावर अनेक सांसारिक आपत्ति एकीमागून एक कोसळल्या. त्यामुळें त्याचें मन संसारांतून उठून विठ्ठलाकडे पूर्णपणें लागलें. स्वतां भजन करितां करितां तो पुढें लोकांना भक्तीचें वळण लावण्याकरितां कथा करूं लागला. कथेंत तात्कालिक स्फूर्तीनें तो अभंगरचना करी. त्यानें हजारों प्रासंगिक अभंग केले आहेत. त्याच्या वाणींत कळकळ व सहजता हे गुण ओतप्रोत भरलेले आहेत. प्रसाद हा कवितेचा प्राण. त्या प्राणानें त्याची कविता नुसती मुसमुसलेली आहे. त्याचे 'अभंग' खरोखरच अभंग आहेत.

जन्मशक–१५३०. मृत्युशक–१५७१.

---

## स्फुट अभंग.

१

भेटीलागीं जीवा लागलीसे आस। पाहें रात्रंदिवस वाट तुझी ॥ १
पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन। तैसें माझें मन वाट पाहे ॥ २
दिवाळिच्या मुळा[1] लेंकी आसावली[2]। पाहातसे वाटुली पंढरीची ॥ ३
भुकेलिया बाळ अति शोक करी। वाट पाहे परि माउलीची ॥ ४
तुका म्हणे मज लागलीसे भूक। धावूनि श्रीमुख दावीं देवा ॥ ५

---

१ माहेरचें बोलावणें, माघारी. २ आशा धरून बसली, उत्कंठित झाली.

२

आळस पाडीं विषयकामीं । शक्ति देई तुझ्या नामीं ॥ १
हीच विनवणी विनवणी । विनविली धरा मनीं ॥ २
आणिक वचना मुकी वाणी । तुम्ह्या गर्जो द्यावी गुणीं ॥ ३
तुका म्हणे पाय डोळां । पाहें एरवीं आंधळा ॥ ४

३

अधमाची यारी[1] । रंग पतंगाचे परी ॥ १
विटे न लगतां क्षण । मोल जाय वायांविण ॥ २
सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं[2] ॥ ३
तुका म्हणे देवा । मज झणीं[3] ऐसें दावा[4] ॥ ४

४

भय वाटे पर । न सुटे हा संसार ॥ ॥ १
ऐसा पडलों कांचणी[5] । करीं धावा म्हणउनी ॥ २
विचारितों[6] कांहीं । तों हें मन हातीं नाहीं ॥ ३
तुका म्हणे देवा । येथें न पुरे रिघांवा[7] ॥ ४

५

मजपुढें नाहीं आणिक बोलता । ऐसें कांहीं चित्ता वाटतसे ॥ १
याचा कांहीं तुम्हीं देखावा परिहार । सर्वज्ञ उदार पांडुरंगा ॥ २
कामक्रोधें नाहीं सांडिलें आसन । राहिले असोन देहामध्यें ॥ ३
तुका म्हणे आतां झालें उत्तराई[8] । कळों यावें पायीं निरोपिलें ॥ ४

१ मैत्री, दोस्ती. २ हृत्कमलीं. ३ न. ४ अशा अधमांचें मला दर्शनच होणार नाहीं, असें करा. ५ झिजणी, काळजी. ६ विचार करितों. ७ शिरकाव, मार्ग.—मनाला आवरण्याचे कामीं माझी गति किंवा मति कुंठित होते. ८ जबाबदारीतून सुटलेला.

६

हिरा ठेवितां ऐरणी। वांचे मारितां जो घणीं ॥ १
तोचि मोल पावे खरा । क[1]रणाचा होय चुरा ॥ २
मोहरा[2] तोचि अंगें । सूत न जळे ज्याच्या संगें ॥ ३
तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ४

७

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास[3] विचारें वेंच करी ॥ १
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव-खाणी ॥ २
पर-उपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३
भूतदया गाईपशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥ ४
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥ ५
तुका म्हणे हेंचि आश्रमा[4]चें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६

८

नम्र जाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥ १
हेंचि शूरत्वाचें अंग । ह[5]री आणिला श्रीरंग ॥ २
अवघा झाला पण । ल[6]वण सकळा कारण ॥ ३
तुका म्हणे पाणी । पातळपणें तळा खणी ॥ ४

९

साहोनिया टांकीघाये । पाषाण देवचि जाला पाहें ॥ १
तया रीती दृढ मन । करीं साधाया का[7]रण ॥ २

---

१ बनावटाचा. २ एक अज्ञात मणि. ३ निर्लिप्त मनानें, अनासक्त बुद्धीनें. ४ गृहस्थाश्रमाचें ५ हारीला. ६ नम्रता. ७ हेतु, कार्य.

बाण शस्त्र साहे गोळी । शूरा ठाव उंच स्थळीं ॥ ३
तुका म्हणे सती । अग्न न देखे ज्या रीती ॥ ४

१०

ओलें मूळ भेदी खडकाचें आंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥ १
नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड । नाहीं कईवाड तोंचवरी ॥ २
दोरें चिरा कापे पडिला कांचणी । अभ्यासें सेवनीं विष पडे ॥ ३
तुका म्हणे कैसा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ॥ ४

११

मान-अपमान-गोवें । अवघें गुंडूनी ठेवावें ॥ १
हेंचि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥ २
शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ॥ ३
आली ऊर्मी साहें । तुका म्हणे थोडें आहे ॥ ४



१ पूर्णपण. २ युक्ति, कारवाई. ३ झिजणी. ४ जागा. ५ गुंता, गोंधळ, घोंटाळा, ६ विकारतरंग.

## ३.

# वामन पंडित.

हा जातीचा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव कुमटें येथील हा जोशी होता. हा मोठा जाडा विद्वान् होता. याचें अध्ययन काशीस झालें होतें. संस्कृतांत हा फार निपुण होता. पुढें हा मराठी कविता करूं लागला. ‘ यथार्थ दीपिका ’ नांवाची यानें गीतेवर टीका केली आहे. ती चांगली आहे. हा भक्तिमार्गी होता. त्यामुळें अनेक रसाळ आख्यानें यानें रचिलीं असून त्यांत परमेश्वराच्या गोड लीला प्रेमानें वर्णिल्या आहेत. याच्या कवितेंत यमकें फार; म्हणून याला ‘ यमक्या वामन ’ म्हणतात. याची रचना श्लोकबद्ध आहे. ‘ सुश्लोक वामनाचा ’ अशी म्हणच पडली आहे. याची कविता रसाळ व सुंदर कल्पनांनीं नटलेली आहे. पण ती अत्यंत क्लिष्ट व दुर्बोध आहे. व्याकरणाकडे याचें अत्यंत दुर्लक्ष होतें. मृत्युशक–१५९५.

---

## भरत व वसिष्ठ.

( आपल्याला राज्य मिळवून देण्याकरितां रामाला वनांत पाठविल्याबद्दल भरतानें कैकेयीची निर्भर्त्सना केली. नंतर तो कौसल्येच्या भेटीला गेला. तिथे कौसल्या त्याला बरीच टाकून बोलली. भरतानें अनेक शपथा घेऊन आपण या कामीं निर्दोषी आहों, हें तिला पटवून दिलें. तेव्हां तिचा त्याच्यावरील राग निवाला. इतक्यांत वसिष्ठानें त्याला राज्याचा स्वीकार करण्यास सांगितलें. यापुढील भाग या उताऱ्यांत आहे. )

### श्लोक.

तों वसिष्ठ वदला भरतातें । रामपादनिजलाभरतातें ॥
पाळि यावरि समस्त धरा हे । राजनीति करिं सावध राहें ॥ १

---

१ रामचरणाची प्राप्ति करून घेण्याला उत्सुक.

रायें तुंतेंचि दिधलें स्वनृपासना रे ।
संपूर्ण तूं जननिचीं करिं वासना रे ॥
शब्दार्थ हे न कळती गुरु-लाघवाचे ।
साचे म्हणूनि पद आठवि राघवाचे ॥ २

( घनाक्षरी )

म्हणे भरत हा राम । त्राहे त्राहे मेघ-श्याम ॥
वसिष्ठ हा गुरु नाम । तोहि मज कोपला ॥ १
अंतरले तुझे पाय । तया राज्याचे उपाय ॥
सांगे मज हाय हाय । नव्हे गुरु आपला ॥ २
अग्नितुल्य वाटे राज्य । मज जाळील सामराज्य ॥
वरी ऋषी घाली आज्य । त्याणें जीव तापला ॥ ३
दावीं सत्वर चरण । किंवा स्वामी दे मरण ॥
तुझ्या नामाचें स्मरण । त्याचा भैव सपला ॥ ४

स्मरोनि ऐसें रघुनंदनातें । त्या राघवाच्या पद वंदनातें ॥
जावें असा भाव धरूनि साच । बोले वसिष्ठाप्रतिही तसाच ॥४

राजाधिराज रघुराजचि एक जाणा
पाहों चला सकळ जाउनि त्या सुजाणा ॥
आम्ही समस्त जन किंकरैं राघवाचे ॥
जे रामनाम जपतों अजि नित्य वाचे ॥ ५

विना राक्षसी कैकयी काननातें । चला सर्व पाहूं मृगांकाननातें ॥
प्रयत्नेंचि घेऊनि येऊं गृहातें । न येतां समर्पूं शरीरें स्वहातें ॥ ६

---

१ चतुराईचे, खुबीचे. २ खरोखर. ३ संसार, जन्ममृत्यु. ४ दास. ५ अहो ! ६ अरण्यांत. ७ मृगांकासारखें ( चंद्रासारखें ) आहे मुख ज्याचें त्याला. ८ प्राणत्याग करूं.

नोंद नं. ३९२५ ठाणे



क्र. २०१

येणार ते या अथवा नकाही । राहेन मी हें न घडेचि कांहीं ॥
बोलोनिया स्पष्टचि चालिला हो । शोकांतही घे प्रभुनामलाहो ॥ ७
हा राम ! हा राम ! असेंचि वाचे । चित्तांत पाय प्रभुराघवाचे ॥
त्यजी कुलाचार्यही रामवाटे । कीं तो गुरू त्यास गुरू न वाटे ॥ ८
येणार ते या अथवा नकाही । शब्दांत या अर्थ सखोल कांहीं ॥
कीं जो गुरू अंतर रामपायीं । पाडी, त्यजावा गुरु तो उपायीं ॥ ९
श्रीरामही टाकुनि राज्य मातें । जो घे म्हणे त्या ऋषिसत्तमातें ॥
गुरुत्व कैंचें तरि मी उपेक्षा । करीन, त्याची न मला अपेक्षा ॥ १०
या कारणें या अथवा नकाही । राहेन मी हें न घडेचि कांहीं ॥
ऐशी उपेक्षा वदनीं वदे तो । श्लोकांत हा व्यासहि भाव देतो ॥ ११
नाहीं तरी या अथवा नकाही । गुरूस बोलेल घडेल कांहीं ॥
रामानिमित्तें गुरुहि त्यजावा । वाक्यांत भावार्थ असा भजावा ॥ १२
रामानिमित्तें जननीस टाकी । पाणी न पी राज्य-नदी-तटाकीं ॥
लंघूनियाही गुरुसंगतीतें । पावे अहो दे गुरु ज्या गतीतें ॥ १३
गुरुविणें न घडे परमा गती । गति शुकादि गुरूसाचि मागती ॥
परि गुरू करि अंतर राघवीं । न गुरु तो ठक, दांभिक, लँघवी ॥ १४
तो बाप जो राघव-भक्ति दावी । तसीच जे मायहि ते वदावी ॥
जो राम दावी गुरु तोचि साच । श्रुत्यर्थ-इत्यर्थ असे असाच ॥ १५
वासिष्ठ घे राज्य म्हणेचि साच । परंतु भावार्थ नव्हे तसाच ॥
त्याच्या परीक्षार्थचि बोलिला हो । त्यांहूनि आधीं मुनि चालिला हो ॥ १६

---

१ लाभ. २ रामाकडे जाण्याकरितां. ३ ऋषिश्रेष्ठाला. ४ हेळसांड, अनादर. ५ घ्यावा. ६ लबाड, कावेबाज. ७ श्रुतींचा तात्पर्यार्थ. ८ भरताहून.

आज्ञा गुरूचि अवघे करीती। सच्छिष्य ते लोक-[1]अलोक-रीती ॥
परंतु [2]त्याच्या वचनें तयातें। न टाकिती सत्पद-दातयातें ॥ १७
राम न त्यजी तईंच गुरूतें। न त्यजि [3]स्वसुख-कल्पतरूतें ॥
जो असें वचनही न [4]मनी तो। श्रीगुरू-नमनीं हीन मनीं तो ॥ १८
म्हणे परीक्षार्थचि टाकिं मातें। तसा म्हणे टाकिं रघूत्तमातें ॥
उल्लंघितां शब्दचि इष्ट वाटे। म्हणोनि लागे ऋषिवर्य [5]वाटे ॥ १९
प्रकरणीं पुढल्या गुरुराज तो। भरतसंगतिनेंच विराजतो ॥
जरि पथीं गुरु होय समागमीं। तरिच राम मिळे निगम[6]ागमीं ॥ २०
वसिष्ठ, तो[7], आणि समस्त मा[8]या। रामार्थ टाकूनि समग्र मा[9]या ॥
सेना, प्रजा सर्वहि त्याच वेळे। जाती, जसे लंघिति सिंधु वेळे[10] ॥ २१



१ लौकिक रीतीस जुळणारी किंवा न जुळणारी. २ परंतु गुरु परमेश्वरपदाची प्राप्ति करून देणारा असल्यामुळें त्यानें आपला त्याग करण्यास सांगितलें, तरी सच्छिष्य त्याचा त्याग त्याच्या आज्ञेनेंही करीत नाहींत. पण भरतानें त्याचा त्याग केला; याचें कारण पुढील श्लोकांत आहे. ३ आपल्या सुखाचा कल्पवृक्षच अशातें ४ मान्य करितो. ५ रामाच्या वाटेला. ६ वेद व शास्त्र यांत. ७ भरत. ८ त्याच्या आया. ९ ममता, संसारपाश. १० मर्यादेला.

## ४.

# रामदास.

गोदावरीच्या कांठीं जांब म्हणून एक गांव आहे, तेथील हा राहणारा. याच्या बापाचें नांव सूर्याजीपंत व आईचें नांव राणूबाई. हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. याचें मूळचें नांव नारायण. पुढें हा पुरा रामभक्त झाल्यामुळें याला रामदास असें नांव मिळालें. याच्या योग्यतेवरून याला ' समर्थ ' असें नांव पुढें प्राप्त झालें. याच नांवानें तो प्रसिद्ध आहे.

लहानपणापासून याचें लक्ष संसाराकडे नव्हतें. हा ' सावधान ' म्हणतांच लग्नांतून पळाला. पंचवटींत राहून यानें बारा वर्षें पुरश्चरण केलें. पुढें सर्व देश हा यात्रेच्या निमित्तानें फिरला. तेव्हां मुसलमानी अंमलामुळें लोकांची व धर्माची झालेली दैना याच्या पाहण्यांत आली. तेव्हां याचा जीव तळमळला. मग हा साताऱ्याजवळ चाफळ-खोऱ्यांत येऊन राहिला. तेथें लोकजागृतीचें उत्तम कार्य करून शिवाजीच्या प्रयत्नाला यानें अनुकूळ भूमिका तयार केली. शिवाजीवर याचें प्रेम फार होतें व शिवाजीचीही याच्यावर भारी निष्ठा होती. त्यानें याला पुढें परळीच्या किल्ल्यावर आणून ठेविलें, व त्याला सज्जनगड असें नांव दिलें. याचा ' दासबोध ' हा उत्कृष्ट ओंवीबद्ध ग्रंथ आहे. शिवाय स्फुट कविता पुष्कळच आहे. याच्या कवितेंत प्रसाद व कळकळ फारच आहे. ' प्रयत्न व उद्योग ' यांवर यानें भारी भर देऊन लोकांना निवृत्तींत प्रवृत्ति कशी राखावी, याचें उत्तम शिक्षण दिलें. राष्ट्रीय दृष्टीनें या सत्पुरुषाचें महत्त्व फार आहे.

जन्मशक–१५३०. मृत्युशक–१६०३.

---

## स्फुट अभंग.

१

अर्थेंविण पाठ कासया करावें । व्यर्थ कां मरावें घोकूनिया ॥ १
घोकूनिया काय वेगीं अर्थ पाहें । अर्थरूप राहें होऊनिया ॥ २
पाहोनिया अर्थ सार्थक करावें । रामदास भावें सांगतसे ॥ ३

२

भेटी देईना जनासी । पाठी लागे सज्जनासी ॥ १
ऐसें प्रीतीचें लक्षण । भेटीवीण नाहीं क्षण ॥ २
नसे साधनसायासीं । तो हा आम्हां अनायासीं ॥ ३
रामीं रामदास म्हणे । संतसंगाचेनि गुणें ॥ ४

३

ज्ञानेंवीण जी जी कळा । ती ती जाणावी अवकळा ॥ १
ऐसें भगवंत बोलिला । चित्त द्यावें त्याच्या बोला ॥ २
एक ज्ञानचि सार्थक । सर्व कर्म निरर्थक ॥ ३
दास म्हणे ज्ञानेंवीण । प्राणी जन्मला पाषाण ॥ ४

४

मज गांजिलें तें साहें । परि भक्तांचें न साहें ॥ १
माझ्या भक्तां शीण व्हावा । मग मजसीं त्यांसीं दावा ॥ २
मज अवतार घेणें । माझ्या भक्तांचे कारणें ॥ ३
निज दासांसी पाळावें । दुर्जनांसी निर्दाळावें ॥ ४

५

नद्या मर्यादा सांडिती । उष्णकाळीं वोर्से होती ॥ १
तैसा तारुण्याचा भर । सवेंचि होतसे उतार ॥ २
भाग्य चढे लागवेगें । सवेंचि प्राणी भीक मागे ॥ ३
रामदास म्हणे काळ । दोनी दिवस पर्वकाळ ॥ ४

---

१ नाना साधनांची मेहनत करणाऱ्यांना. २ वैर. ३ नाश करावा. ४ कोरड्या.

६

अंध अंधारीं बैसले । त्यांसि हातें पालवीलें ॥ १
त्यांसि कळेना कळेना । त्यांची वृत्ति निवळेना ॥ २
संतसंगाचें बोलणें । सांसारिक काय जाणे ॥ ३
म्हणे रामीं रामदास । केला नसतां अभ्यास ॥ ४

---

५.

# सामराज.

याच्या चरित्राची माहिती मिळत नाहीं. हा शाहूमहाराजांच्या वेळीं होऊन गेला असावा. 'सामराज,' 'शामराज' किंवा 'शाम' या नांवांवर मोडणारे अनेक ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. पण हीं तिन्ही नांवें धारण करणारी व्यक्ति एकच होती कीं काय, याचा निर्णय करितां येत नाहीं. प्रस्तुत उतारा रुक्मिणीहरणांतला आहे. 'रुक्मिणीहरण' काव्य बरेंच सरस आहे. पण त्यांतील कल्पना बऱ्याच संस्कृत-ग्रंथांतून उचलेल्या दिसतात. जागजागीं प्रसाद आहे; पण क्लिष्टताही पुष्कळ ठिकाणीं आहे. व्याकरणदृष्ट्या हें काव्य उत्तम प्रतीचें नाहीं. यांत सुभाषितें पुष्कळ आहेत, वर्णनें सरस आहेत, भक्तीनें जागजागीं हें फुललेलें आहे, शब्दयोजना तितकी समर्पक नाहीं.

---

## मनास बोध.

[ सुदेव नांवाचा ब्राह्मण रुक्मिणीची पत्रिका घेऊन श्रीकृष्णाकडे जाण्यास निघाला. वाटेनें जात असतांना एकान्तांत त्यानें आपल्या मनाला जो सुंदर बोध केला, तो पुढील उताऱ्यांत आहे. ]

---

१ हाताच्या खुणेनें बोलावलें.

## श्लोक.

प्रवासाविधि[1] आदरें त्वरित फार केला असे ।
निदेश[2] नृपनंदिनी[3]विहित मानसीं हा वसे ॥
कमंडलु करीं धरी स्मरणमालिका[4] आदरी ।
घरींहुन निघे महामुदित होय जो अंतरीं ॥ १

द्विजवर निजमार्गीं नित्य येकांत सेवी ।
सहज हरिकृपेच्या जो सिदोरीस जेवी ॥
यदुपतिभजनाची लागली थोर गोडी ।
हळुहळु विषयांची वासना यास सोडी ॥ २

तदुपरि उपदेशी आपल्या या मनाला ।
क्षणभरि परि नेदी ठाव जें कामनांला ॥
सदनजनितचिंता[5] सर्वदा जें न साहे ।
यदुकुलमणि[6] जेथें नित्य येवोनि राहे ॥ ३

पुसतँ पुसतँ[7] आली या शरीरा जरा हे ।
परि हरिभजनाची वासना वांझ[8] राहे ॥
विषयवडिशें[9] लोभें गुंतसी मोहजाळीं ।
कवण विषय आतां सोडवी अंतकाळीं ॥ ४

चलनवलन राहे, बोल भार्या न साहे ।
जवळि कधिं न बाहे[10], नित्य सक्रोध पाहे ॥

---

१ शास्त्रानुसार प्रयाणसमयीं करण्याचा विधि. २ आज्ञा; सूचना. ३ राजकन्येनें सांगितलेला—केलेला. ४ स्मरणी. ५ घरची-संसाराची चिंता. ६ यदुकुलाचें भूषण—श्रीकृष्ण. ७ विचारीत विचारीत—हळुहळू. ८ निष्फळ, अपुरी. ९ मासे धरण्याचा गळ ( आमिष ). १० बोलावीत, हाका मारीत.

अझुणि तरि, मना, तूं सांडि ये[१]ची करावी ।
झडकरिं [२]उगली हे शांतिकांता वरावी ॥ ५
निशिदिनिं परनिंदा[३]स्वाद घेतां न राहे ।
क्षणभरि हरिनामस्पर्श जीला न साहे ॥
अतिमधुर रसें हे सर्वदा तृप्त केली ।
तदपि मज [४]रसज्ञा काय [५]उत्तीर्ण जाली ॥ ६
अझुणि तुज मना हें काय कर्तव्य आहे ।
हरिचरणसरोजीं लीन होवोनि राहें ॥
स्मरण करिं हरीचें, व्यर्थ आयुष्य वेंचे ।
मरण जवळि आलें; काळ कोणास मेचे[६] ॥ ७

गोकुळीं प्रकटली द्युति सांवळी ।
गोधनें द्रुमतळीं सहसा वळी ॥
जे सनातन जगत्त्रय-सावली ।
तत्पदीं हृदयवृत्ति विसांवली ॥ ८

[७]द्वारकापतिपदांबुजमार्गी । लागलें मन विटे अप[८]वर्गी ॥
वासुदेव मज कौस्तुभधारी । आठवे नलिननाभ[९] मुरारी ॥ ९
जो परा[१०]त्पर अगोचर[११] वेदां । [१२]नातुडेच हरि जो मतभेदां ॥
गोपवेष मुरलीधर ध्यावा । तोचि त्वां मुखिं अहर्निश गावा ॥ १०
कृष्णमूर्ति हृदयीं जडलीसे । तत्पदीं दृढमिठी पडलीसे ॥
विश्व हें सकळ तन्मय जालें । द्वैतभान अवघेंचि उडालें । ११

---

१ हिची ( भार्येची ). २ मुकाटपणीं, हळूच. ३ परनिंदेची गोडी. ४ रसना, जीभ. ५ उतराई. ६ मोजतो, डरतो. ७ द्वारकाधीश श्रीकृष्णाच्या पदकमलाच्या वाटेला. ८ मोक्षाचे ठायीं. ९ नलिन ( कमल ) आहे नाभीच्या ठायीं ज्याच्या. १० सर्वश्रेष्ठ. ११ अगम्य, अज्ञेय. १२ प्राप्त होत–हातीं लागत नाहीं.

हा भवाब्धि मजला न उलंघे । धुंडितां विषय मानस लंघे[1] ॥
सांवळा सगुण जो अवतारी । कर्णधार उतरील उतारीं ॥ १२
ओघ येति तुझिया स्तवनाचे । [3]भारती वहुत यास्तव नाचे ॥
वेग जाय मुरडोन मनाचा । नित्य उत्सव तुझ्या नमनाचा ॥ १३
मातलों धनमदें जगदीशा । नाठवेशि मज गोपतिवेषा ॥
वेदवेद्य[5]चरिता, भगवंता । येइं मी शरण तूज अनंता ॥ १४
आयकें द्विज अजामिळ नांवें । त्याजला पतितराज म्हणावें ॥
उद्धरे निधि अनाचरणाचा । हा प्रताप तुझिया चरणांचा ॥ १५
रूप हें सहजसुंदर तूझें । नोळखे हृदय पामर माझें ॥
हें निरर्थक भरे बहु [6]व्हावें । या अनित्य विषयांवरि धावे ॥ १६
खेळ हा सकल मोडुन नेला । थोर तां मज अनुग्रह केला ॥
दावणीहुनि सुटे पशु जैसा । होय मी सहज मुक्तच तैसा ॥ १७
तूजवीण मन पांगुळ झालें । आंधळेपण मतीसहि आलें ॥
ऊचलून कडिये मज घेईं । कृष्णरूपजननी स्तन देईं ॥ १८
तूं असोनि जननी कनवाळू । मी तुझें परम बाळ भुकाळू ॥
काय होय अति वो[9] रस तूझा । प्राण जाय तुजवांचुन माझा ॥ १९
मी विषण्ण विलपें [10]परदेशी । तूं कसें मज अनतर देशी ॥
वत्सले त्यजुनि बाळक तान्हा । काय हा पळविशी निजपान्हा ॥ २०
[11]बाळकें रुसतसे जननींसीं । काय माय रुसते परि त्यासीं ॥
वासुरा त्यजुन गाय [12]खेंडाणी । काय जाय पशुजाति अडाणी ॥ २१


---

१ घेरतो, ग्रासतो, घाला घालतो. २ पैलतीरीं. ३ वाणी. ४ धाव, जोर. ५ वेदांना ठाऊक आहे चरित्र ज्याचें अशा. ६ हांवेनें, असोशीनें, लोभानें. ७ त्वां. ८ प्रेमळ, वत्सल. ९ अगे! १० ताटातूट–वियोग झालेला. ११ 'बाळक' असें पाहिजे. तृतीया नको. कवीचा दोष. १२ नाठाळ, लाथाळ.

श्वापदांत भयभीत वेराकी[1] । काय हे हरिणि पाडस टाकी ॥
चारया जरि विहंगिणि जाते । ते फिरोन पिलयांप्रति येते ॥ २२
कोरडें मुख पडे बहु माझें । न द्रवे अजुनि मानस तूझें ॥
म्यां किती तरि हरी विलपावें[2] । कोण काळ तरि तारिल पावें[3] ॥ २३
कंठ हा गहिंवरें बहु दाटे । लावि सत्वर मला निज वाटे ॥
पंथ हा जरि तुझा उमगावा । पाश[4] हा तरिच रे उगवावा[5] ॥ २४

बहुविध महायासें ऐसें मनाप्रति बोलतां ।
स्मरणहि शरीराचें ज्याला नसे पण चालतां ॥
तदपि करुणासिंधू पंथा स्वकीय न टाकवी ।
जळनिधिमहासीमे[6]मध्यें हळू हळू पाववी ॥ २५

( विभाग पहिला समाप्त )



...ठी ग्रंथ संग्रहा... नं.... क्र.... ठाणे.

---

१ गरीब, बिचारी, दीन. २ शोक करावा. ३ कृपा कर. ४ भवपाश, संसाराचा बंध. ५ सुटावा, मोकळा व्हावा. ६ महासागराच्या अफाट शिंवेंत—द्वारकेजवळ.

# विभाग दुसरा.

## ६.

# मुक्तेश्वर.

प्रसिद्ध भगवद्भक्तकवि एकनाथ याच्या मुलीचा हा मुलगा. याच्या आईचें नांव लीलाबाई व बापाचें विश्वंभरबावा. जातीनें देशस्थ ब्राह्मण. पैठणचा राहणारा. हा जन्मतः मुका असून एकनाथाच्या कृपेनें पुढें याला वाचा आली, असें म्हणतात. याची कविता बहुतेक ओंवीबद्ध असून ती अत्यंत रसाळ व मधुर आहे. याची वर्णनपद्धति फारच बहारीची आहे. भाषा अत्यंत प्रौढ व ओजस्वी आहे. एकंदरींत मराठी कवींत याची उत्तमांत गणना असून ती अगदीं यथार्थ आहे. यानें भारतावर प्राकृतांत रचना केली; पण त्याचीं सर्व पर्वें उपलब्ध नाहींत. आदि, सभा, वन व विराट हीं चारच पर्वें हल्लीं प्रसिद्ध आहेत.

जन्मशक—१५३१.

---

## व्यवहार व सात्त्विक भाव.

[ पांडव वनवासांत असतां एकदां प्रसंगाच्या ओघांत द्रौपदीनें धर्माशीं बोलतांना धर्माचरणासंबंधानें अश्रद्धा प्रकट केली. अधर्मानें चालणारा दुर्योधन राज्यवैभव भोगीत आहे, व धर्माला भिऊन वागणारे तुम्ही बंधुपत्नींसह वनवासांत हाल भोगीत आहां; मग धर्माचा उपयोग काय ? असा तिच्या बोलण्याचा रोंख होता. हेंच तिचें म्हणणें पुढील उताऱ्यांत गोंवलेलें आहे. ]

यावरी एकान्त-अवसरीं । सखेद द्रौपदी सुंदरी ।
म्हणे, कल्याण कवणे परी । अवलंबिलें तुवां एथें ॥ १

---

१ प्रसंगीं. २ प्रकारें. ३ साधलें, करून घेतलें.

दीनें, तापसी, शक्तिहीनें । शिलोंछवृत्ती वेंचिती कण ।
तयां-ऐसें हें वर्तणें । तें काय त्वां मांडिलें ॥ २
वेंचितां धनाचिया कोटी । आयुष्य न मिळे घटिका-त्रुटी ।
तो अवघा जन्म इये रहाटी । अरण्यवासीं लोटिला ॥ ३
आज्ञा देईं भीमार्जुनां । करूनि शत्रूच्या दहना ।
राज्य साधिलिया महाप्राज्ञा । उभय लोकीं सुखलाभ ॥ ४
साधलिया स्वराज्य-संपत्ती । यज्ञीं देव तृप्त होती ।
श्राद्धीं पितृगण अतिथी । अन्नदानें तोषती ॥ ५
हरेल दारिद्र्याचें दुःख । मित्र, बंधु पावती सुख ।
अनित्य संसारीं कौतुक । करूनि जाती दादुले ॥ ६
जेणें पाविजे परम दुःख । काय तें साधुवृत्तीचें सुख ।
वैरी उपहासती लोक । म्हणती दीनें अशक्तें ॥ ७
टाकिशी रायाचे धर्म । तोचि रायातें अधर्म ।
शांतीनें क्लेश परम । कुटुंबेंसीं भोगिसी ॥ ८
आइक आतां इतिहासातें । विरोचनें पुसे प्रल्हादातें ।
शांति न पाविजे श्रेयातें । क्रोधें होतसे सुखलाभू ॥ ९
ऐकोनि बोले विचार कुशळ । कार्याकार्य बळाबळ ।
ओळखूनी काळ वेळ । कार्यसिद्धी जाणतां ॥ १०

---

१ दरिद्री, वैभवहीन. २ पराक्रमशून्य. ३ शेतांत पडलेलीं कणसें वेंचून त्या धान्यावर निर्वाह करणारे. ४ पाव क्षण, लवार्ध. ५ रीत, पद्धत. ६ नवरे. ७अपकार करणाऱ्या शत्रूला शासन न करितां स्वस्थ बसल्यानें. ८ कुटुंबांतील मंडळीसह. ९ हा प्रल्हादाचा मुलगा. १० अक्रोध, अपकाराची चीड न येणें, क्षमा. ११ सुख.

# विभाग दुसरा.

## ६.

## मुक्तेश्वर.

प्रसिद्ध भगवद्भक्तकवि एकनाथ याच्या मुलीचा हा मुलगा. याच्या आईचें नांव लीलाबाई व बापाचें विश्वंभरबावा. जातीनें देशस्थ ब्राह्मण. पैठणचा राहणारा. हा जन्मतः मुका असून एकनाथाच्या कृपेनें पुढें याला वाचा आली, असें म्हणतात. याची कविता बहुतेक ओंवीबद्ध असून ती अत्यंत रसाळ व मधुर आहे. याची वर्णनपद्धति फारच बहारीची आहे. भाषा अत्यंत प्रौढ व ओजस्वी आहे. एकंदरींत मराठी कवींत याची उत्तमांत गणना असून ती अगदीं यथार्थ आहे. यानें भारतावर प्राकृतांत रचना केली; पण त्याचीं सर्व पर्वें उपलब्ध नाहींत. आदि, सभा, वन व विराट हीं चारच पर्वें हल्लीं प्रसिद्ध आहेत.

जन्मशक—१५३१.

---

## व्यवहार व सात्त्विक भाव.

[ पांडव वनवासांत असतां एकदां प्रसंगाच्या ओघांत द्रौपदीनें धर्माशीं बोलतांना धर्माचरणासंबंधानें अश्रद्धा प्रकट केली. अधर्मानें चालणारा दुर्योधन राज्यवैभव भोगीत आहे, व धर्माला भिऊन वागणारे तुम्ही बंधुपत्नीसह वनवासांत हाल भोगीत आहां; मग धर्माचा उपयोग काय ? असा तिच्या बोलण्याचा रोंख होता. हेंच तिचें म्हणणें पुढील उताऱ्यांत गोंवलेलें आहे. ]

यावरी एकान्त-अवसरीं[1] । सखेद द्रौपदी सुंदरी ।
म्हणे, कल्याण कवणे परी[2] । अवलंबिलें[3] तुवां एथें ॥ १

---

१ प्रसंगीं. २ प्रकारें. ३ साधलें, करून घेतलें.

व्यवहारीं शांती न ये कामा । परमार्थ क्रोध नाशी धर्मा ।
जेथें ज्याचाचि महिमा । तें तेथेंची योजावें ॥ ११
प्रपंचीं अवलंबिल्या शांती । जोडिली ते जाय वृत्ती ।
आपुल्या दारातें संपत्ती । प्राप्त नव्हे आपणिया ॥ १२
शांति-पुरुषाची अंगना । हेळूनी सांडी जे पतीच्या वचना ।
पुत्र होऊनी मेहुणा । चेष्टा करी विनोदें ॥ १३
क्रूरासी सेविती सेवक । क्रूरासी भीती प्रजालोक ।
क्रूरास्तव हा महाधाक । शत्रु वाहती सर्वदा ॥ १४
क्रूर जाणोनि स्वभाव । मर्यादेनें वर्तती सर्व ।
क्रूरता भोगी वैभव । सात्त्विका भिक्षा मिळेना ॥ १५
क्रूर पुरुषातें देखोनी । स्त्रीपुरुषें पारिके जनीं ।
न्यायें वर्तती स्वधर्माचरणीं । बुद्धी न करिती विपरीत ॥ १६
प्रपंचीं धरितां सात्त्विकता । तैं आपण केलें आपल्या घाता ।
सत्त्वगुण तो परमार्था । शोभा आणी सर्वस्वें ॥ १७
लोहं कार्य, नव्हे कनक । प्रपंच जिणों न शके सात्त्विक ।
लोह कनकाशीं नोहे तुक । तेवीं क्रूरता परमार्थी ॥ १८
साधु बोलती सत्त्वगुणें । स्त्रिया वोसंडती रजोगुणें ।
शत्रु दंडावे तमोगुणें । हें जाणणे शहाणियानें ॥ १९

---

१ उपजीविकेचें साधन. २ आपोआप, प्रयत्न न करितां. ३ क्षमाशील पुरुषाची. ४ धिक्कारून, अवहेलना करून, दुर्लक्ष करून. ५ परीक्षा करितात, ओळखतात. ६ लोह कार्य; कनक ( कार्य ) नव्हे--असा अन्वय. जगांत लोखंडाचा खरा उपयोग आहे, सोन्याचा नाहीं,--असा अर्थ. ७ सोनें. ८ बरोबरी, तुलना. ९ बरळतात, बोलतात.

खळा-कुटिलाचे ठायीं । शांती धरितां पडणें अपायीं ।
जैसें कंटक[1] मर्दावे पाहीं । तेवीं दुर्जन दंडावे[2] ॥ २०

देखोनियां साधुसंतां । भावें चरणीं ठेविजे माथा ।
तेथें दावितां क्रूरता । अधःपाता जाइजे ॥ २१

म्हणोनी शांतता क्रूरता । सर्वां सर्वत्र येकें रीत ।
केलिया, व्यवहारीं परमार्था । दोहीं तेही जाणिजे ॥ २२

ऐसें प्रल्हादें पवित्रें । बोलिलें तें पुत्रपौत्रें ।
स्वीकारुनी आज्ञा मंत्रें[3] । वर्तणूक वर्तला ॥ २३

यालागीं ऐकें धर्ममूर्ती[4] । करिशी कौरवांची शांती[5] ।
तरिच पावशी विश्रांती । येरवीं दुःख अखंड ॥ २४

---

१ सैन्य. २ ओंवीचा भावार्थ–याकरितां क्षमा किंवा उग्रता यांचा ( व्यवहारांत ) पद्धतशीर–निःपक्षपातानें–एकाच न्यायानें–सारखा–सर्व ठिकाणीं उपयोग केल्यानें–जिथे ( साधूच्या ठिकाणीं ) सात्त्विकता पाहिजे तिथे सात्विकता, जिथे ( दुर्जनाच्या ठिकाणीं ) क्रूरता पाहिजे तिथे क्रूरता दाखविल्यानें व्यवहार चालून परमार्थ साधतो-प्रपंच व परमार्थ दोन्ही साधतात, असें समज. ३ उपदेशानुसार. ४ धर्माचा प्रत्यक्ष पुतळा. ५ नाश.

## ७

# मोरोपंत.

पुणें जिल्ह्यांत बारामती येथें बाबूजी नाईक या नांवाचे एक जहागीरदार होते. त्यांच्या पदरीं रामचंद्रपंत पराडकर म्हणून एक कारकून असत. हेच मोरोपंतांचे वडील. मोरोपंत मोठे विद्वान् असून बारामतीकरांचेच घरीं राहून ते पुराण सांगत असत. ते संस्कृत भाषेंत फार निष्णात असूनही मराठी भाषेवर त्यांचें फार प्रेम असे. कविता करण्याचा नाद त्यांना लहानपणींच लागला. त्यांची कविता पुष्कळ आहे. तींतील बहुतेक मराठीच आहे. थोडी संस्कृतही आहे. त्यांचें आवडतें वृत्त आर्या. त्यांची बहुतेक रचना याच वृत्तांत आहे. कांहीं श्लोक, पदेंही त्यांनीं केलेलीं आहेत. संपूर्ण भारत, एकशें आठ रामायणें, भागवताचे कांहीं भाग, इतर पुराणांतील कांहीं आख्यानें, यांवर त्यांनीं सुरस रचना केलेली आहे. केकावलि व संशयरत्नमाला या दोन त्यांच्या स्वतंत्र कृति असून त्या फारच सरस आहेत. यांशिवाय त्यांचीं फुटकळ पदें, स्तोत्रें वगैरे बरींच आहेत.

त्यांची वाणी प्रौढ, मधुर, सरळ, अत्यंत शुद्ध व रसाळ आहे. प्रासयमकादि शब्दालंकार व उपमा, रूपक, उत्प्रेक्षा इत्यादि अर्थालंकार यांनीं त्यांनीं आपली कवितावधू अगदीं सजवून टाकली आहे. संस्कृतशब्दांच्या वैपुल्यानें तिला कांहींसें काठिण्य आलें आहे, हें खरें. पण त्याच गुणामुळें तिला प्रौढत्व व भारदस्तपणाही आला आहे. एकंदरींत पंतांनीं आपल्या विस्तृत काव्यरचनेनें मराठी वाङ्मयाची फारच मोठी कामगिरी केली आहे.

जन्मशक—१६५१. मृत्युशक—१७१६.

# अंबरीषाख्यान.

( शार्दूलविक्रीडित. )

पूर्वी भूपति अंबरीष रविच्या वंशीं महात्मा असे।
धर्में राज्य करी सदैव भगवद्भक्तांत भावें वसे ॥
भासे सिंहचि संगरांत गमती तच्छत्रु राजे ससे।
तो शांतांत नितांत शांत कमळा-कांतींच चित्तें वसे ॥ १

राजा साधु-समागमें समजला संसार निःसारसा।
सेवी श्रीपतिच्या पदा अलि जसा अत्यादरें सारसा ॥
नामाची धरि कास दास करुनी सद्भक्तिचा आसरा।
प्राशी निर्मल विष्णुचेंच यश जें हांसे सुधेच्या सरा ॥ २

तो भूतीं समदृष्टि, साधुभजनीं रावे, सदा सांवरी।
आंगें दृग्विकळांदिकांसि, भर हा टाकी न दासांवरी ॥
सेवेवांचुनि आपुल्या न विषयीं याचें शरीर क्षण।
श्रीशें जाणुनि हें सुदर्शन दिलें; त्याचें करी रक्षण ॥ ३

( स्रग्धरा. )

सोडीना सुव्रतें तो जसिं जलधिजलें तापलें यादं शीतें।
विष्णु-प्रीत्यर्थ वर्षावधि करुनि करी साधनद्वादशीतें ॥
गेला निर्विघ्न सिद्धी-प्रति नियम न त्या लागला शब्द सारा-।
कीर्ति श्रीमाधवाच्या सतत परिसतां संपला अब्द सारा ॥ ४

---

१ सरोवराला. २ संसारसुखाचे ठिकाणीं. ३ विष्णूचे चक्राचें नांव. ४ जलचर प्राणी. ५ एकादशी करून दुसऱ्या दिवशीं द्वादशी संपण्यापूर्वी पारणें करणें, यास साधनद्वादशी म्हणतात. ६ निर्मल, थोर.

(शार्दूलविक्रीडित.)

स्वाद्वन्नें परमादरें-करुनिया विप्रोत्तमां तर्पुनी ।
त्यांतें कांचन-दक्षिणा सुवसनें सद्भूषणें अर्पुनी ॥
आज्ञा घेउनिया व्रतोक्तनियमा रक्षावयाकारणें ।
तो राजेंद्र करी उपक्रम सुखें साधावया पारणें ॥ ५
तों जो केवळ सर्व कालहि तपस्येसीं सुखें रातला ।
ज्याच्या उग्रपणा प्रणाम असकृत् कल्पानलें घातला ॥
जेणें शक्रहि शिक्षिला जइं महासंपन्मदें मातला ।
दुर्वासा भगवंत तो अतिथि त्या काळीं स्वयें पातला ॥ ६

(द्रुतविलंबित.)

अमृतसिंधु तुम्हीच विभो जनीं । जरि धरा न तुम्ही चवि भोजनीं ।
मदुदयार्थ अहो तरि जेमन । प्रभु करूनि सुखी करिजे मन ॥ ७

(वसंततिलका.)

ऐसें हळूच नृप जोडुनि हात याची ।
ती आयके विनवणी मुनि हा तयाची ॥
स्नानार्थ जाय मग नायक तापसांचा ।
कृष्णोसि, जी नुरवि लेशहि ताप साचा ॥ ८

(पृथ्वी.)

उशीर बहु लागतां नृपति पावला आधिला ।
म्हणे नियत-पारणा-समय पाहिजे साधिला ॥

---

१ इंद्राला आपल्या ऐश्वर्याचा एकदां फार गर्व झाला होता. तेव्हां त्याची धुंदी उतरविण्याकरितां दुर्वासानें शाप देऊन त्याची संपत्ती समुद्रांत बुडवून टाकली होती. २ नियमित पारण्याची वेळ.

तपो-व्रत-जप-क्रतु-प्रमुख धर्महो साधुनीं ।
मनेंहि न विलंघिली अतिथिसत्क्रिया साधुंनीं ॥ ९

(द्रुतविलंबित.)

परमसंकट तें मन घाबरें । करि म्हणोनि तया अनघा बरें— ।
श्रुतिमत द्विज सांगति वारितें । पिउनि हो अघ हें स्थिर वारितें ॥ १०

(मालिनी.)

अशन न जलपानें होय पीतांहि पाणी ।
अनशनहि नव्हेचि स्पष्ट हे वेदवाणी ॥
श्रुतिस अनुसरे जो त्यासि कोणी न दीपी ।
म्हणुनि मुनिमतें तो तोय राजा तदा पी ॥ ११

(स्रग्धरा.)

तों दुर्वासा करूनि स्नपन[2] जप ब्रहद्ध्यान[3] तत्काळ आला ।
प्याला भूपाळ पाणी त्यजुनि अतिथिला यास्तव क्रुद्ध झाला ॥
अत्युष्ण श्वास टाकी अहि खवळिला मांत्रिकें तेविं डोले ।
तोले कल्पांतरुद्रांस न, मग भगवान् तो असें त्यासि बोले ॥ १२

(प्रहर्षिणी.)

कर्माचा तुज परिपाकें[5] चाखवाया ।
आलों मी निज पुरुषार्थ[6] दाखवाया ॥
दुर्वासा अवगणिला तुवांचि शील- ।
भ्रष्टा न क्षतसुकृतायु[7] वांचशील ॥ १३

---

१ धमकावी, वाटेस जाई. २ स्नान. ३ (ब्रहत् + ध्यान) ब्रह्मचिंतन. ४ प्रळयकाळच्या शंकराशीं. ५ फळ. ६ पराक्रम, पाणी, तेज. ७ पुण्य व आयुष्य ज्याचें क्षीण झालें आहे असा तूं.

( स्रग्धरा. )

ऐसें बोले प्रबद्धांजलि-नरपतिला; क्षोभ त्या तापसाचा ।
सांगावा काय ? भासे निजमणिहरणें कोपला साप साचा ॥
दुर्वासा वज्रितापप्रद परि अनिळें वृक्षसा कांपवीला- ।
जेणें तो कोप लज्जा जडभयदबळा त्या न दे कां पवीला ? ॥ १४

( अनुष्टुप्. )

जटा तोडूनि हुंकार—सुमहानाद सोडिला ।
तोडावें जेविं लीलेनें कंबळाच्या दसोडिला ॥ १५

( शालिनी. )

आली उग्रा त्या जटेचीच कृत्या, धावे खाया त्या नृपा विष्णु-भृत्या ।
तों ती दुष्टा देखिली देवचक्रें, जैशी व्याळी स्वार्तिदा पक्षिशक्रें ॥ १६

( स्रग्धरा. )

ज्याचें शंभु-स्वयंभु-प्रभृति सुर यश प्रार्थिती पूत नाकीं ।
त्या रामें ताटिका ती जशि तशि अथवा माधवें पूतना कीं ॥
सद्बोधानें अविद्या जसि तसिच महाभीतिदा विप्रकृत्या ।
जी उग्रा विष्णुचक्रें त्वरित निवटिली ती तदा वि-प्र-कृत्या ॥ १७
जैसें दावानळानें प्रखरतर बळें काननीं सापिणीचें ।
चक्रानें भस्म सद्या करुनि उडवितां त्या महापापिणीचें ॥
दुर्वासा भीति पावे बहुताचि सहसा गर्व त्याचा गळाला ।
सिंह-त्रस्त-द्विपेंद्रासम मग भगवान् तो महात्मा पळाला ॥ १८

---

१ वज्रधारी इंद्राला ताप देणारा. २ जड जे पर्वत त्यांना भय देणारें आहे सामर्थ्य ज्याचें अशा. ३ राक्षसी. ४ सुदर्शन चक्रानें. ५ अत्यंत पीडा देणारी. ६ गरुडानें. ७ ब्रह्मदेव. ८ एक राक्षसी. ही आपल्या स्तनांत विष भरून बालकृष्णाला मारण्याकरितां आली होती. ९ मोठा घात करणारी.

[library stamp]

(मालिनी.)

मग करुनि विचार ब्रह्मलोकासि गेला ।
नमुनि विधिपदांतें हस्त जोडोनि ठेला ॥
व्यसन सकळ सांगे प्राणदानासि याची ।
सचकित परिसे तो प्रार्थना ती तयांची ॥ १९

(वसंततिलका.)

ब्रह्मा म्हणे भगवदिष्ट जनीं न घाला- ।
तूं घालितासि करितासि न या अघाला ॥
देतीं तुला व्यसन-सागरिं हात पेंच- ।
क्षिप्र स्वयें नुरवितींच महातपेंच ॥ २०

(स्रग्धरा.)

आम्ही ज्याचें धरीतों धरिति मनिं जसें सासवेचें सुना भें ।
त्याच्या मूर्तप्रतापें सदवननिपुणें दुष्टकाळें सुनाभें ॥
जेव्हां हा क्षोभ केला तुजवरि मज हें वाटतें फार भारी ।
क्रुद्ध झाल्या प्रभूचें मन वळवुं शके कोण गा कारभारी ॥ २१
दुर्वासा ब्रह्मलोकाहुनिहि परतला तापला विष्णुचक्रें[1] ।
गेला मृत्युंजयाला शरण मग जया सेविती योगिचक्रें[2] ॥
कैलासीं शंकराला नमन करि म्हणे ईश्वरा आसरा हो ।
वांचो त्वच्चिंतनार्थ द्विज निजभजकांमाजिं हा दास राहो ॥ २२
त्या विप्राला म्हणे तो त्रिपुरहर अगा ऐक गा बा मला जे- ।
प्राणी तापार्त कोणी स्मरति मनिं न त्यां रक्षितां नाम लाजे ॥

---

१ चक्रानें. २ योग्यांचे समुदाय.

नाशावे तापपापप्रकर[1] भुज दहा वाहतों याच काजा ।
आम्ही निःशेष वांछा पुरवुनि म्हणतों आदरें याचका जा ॥ २३

( मालिनी. )

परिहरिन् नताचे मी स्वयें ताप सारे ।
परि गुरु अजितांचें[2] शस्त्र हें तापसा रे ॥
मज बळ न असे बा याचिया वारणासी ।
हरिविध हरिच्याही होइना वारणासी ॥ २४

( पृथ्वी. )

सुतासि गुरुच्या गृहा दवडितो जसा बाप हा ।
तसा शिव न रक्षणीं पटु जरी तरी बा पहा ॥
उपाय कथितों तुला व्यसन हें सराया पदा ।
सुदर्शनधराचिया धरिं, हरील तें आपदा ॥ २५

( स्रग्धरा. )

दुःखघ्नी ओषधी जी असि कथि भगवल्लोकपद्यां[3] पिनाकी ।
श्रद्धेनें सेविती हो पिउनि अमृतही जीस अद्यापि नाकी[4] ॥
पावे तीतें वरूनि द्विज, अमित पितां दैत्यचक्रायु[5] धाला ।
नाहीं कांहींच ज्याचा भुजभुजग तया दिव्य-चक्रायुधाला[6] ॥ २६

( अनुष्टुप्. )

विप्र तो क्षिप्र तोयासी मीनसा प्रभूच्या पदा ।
कवळी जवळी प्रेमें ज्याच्या श्री मधुपी सदा ॥ २७

---

१ समुदाय. २ जित नाहीं अशा विष्णूचें. ३ मार्ग. ४ देव. ५ दैत्यसमुदायाचें आयुष्य. ६ तेजस्वी चक्र आहे आयुध ज्याचें त्याला.

म्हणे करूनि त्वद्भक्तीं अपराध पराभवा ।
पावलों मज या ऐशा [1]अक्षमा रक्ष माधवा ॥ २८

( शार्दूलविक्रीडित. )

वारावें निजचक्र हें बहु मला देवा पहा भाजितें ।
जें [2]ब्रह्मण्य [3]शरण्य हें यश तुझें रक्षीं प्रभो आजि तें ॥
चित्तीं आणुनि दोष रोष न धरीं विप्रास या वांचवीं ।
भीताला अभयप्रदान करुनी सत्कीर्तिला सांचवीं ॥ २९

( अनुष्टुप्. )

भक्ताभिमानी भगवान् वदला तेंचि आयका ।
करूनि नमन प्रेमें त्याचि लोकैक नायका ॥ ३०

( स्रग्धरा. )

मी भक्ताधीन, भक्त प्रिय मज न तसें आवडे अन्य, काय— ।
श्री, जथें सान वाटे [4]तदधिक मजला आपुला धन्य काय ॥
माझी सेवाचि मोक्षाहुनिहि बहुमता ज्यांसि जे अंतराय ।
ध्यानीं होऊं न देती क्षणहि बहु मला मान्य ते संतराय ॥ ३१

( अनुष्टुप्. )

सर्वस्व मी सज्जनांचें माझें सर्वस्व सज्जन ।
पावेन मी न पावेल कष्टीं मज्जन मज्जन ॥ ३२

( शार्दूलविक्रीडित. )

लोकीं निःस्पृह मी, सदा अजित मी, चित्तीं उदासीन मी ।
स्वाधीन प्रभु हें खरेंचि परि या भावें सुदासीं नमीं ॥

---

१ ( रक्षण करण्याला ) असमर्थ, दीन. २ ब्राह्मणांचा पुरस्कर्ता. ३ आश्रयस्थान. ४ लक्ष्मीपेक्षां अधिक किंमतीची.

बापा प्रेमळ सज्जनाशय महागंभीर आवर्त तो ।
जैसें वर्तवितो तसोंचि पडला त्यामाजिं हा वर्ततो ॥ ३३

( पृथ्वी. )

तुला विकळ पाहतां मम मन श्रमें घाबरे ।
गमेल निजचातकव्यसन काय मेघा बरें ॥
उपाय कथितों करीं नमन त्याचि संता, पहा- ।
चमत्कृति, हरील तो नृपाचि सर्व संताप हा ॥ ३४

( शार्दूलविक्रीडित. )

दुर्वासा मुनि हो, सदुक्ति सरसा साक्षात्सुधेच्या नद्या ।
सेवा लेशहि पाप ताप न उरो देवा तुम्ही मान द्या ॥
प्रार्था त्या नृपसत्तमासि चुकलों रक्षीं म्हणा जा जगा ।
तो रक्षीलाचि साधु लक्षिति निजापत्यापरी ह्या जगा ॥ ३५

( पृथ्वी. )

असें प्रभु वदे, न दे अभय अंबरीषाकडे- ।
मुनि त्वरित जाय, त्या नृपतिच्याचि पायीं पडे ॥
द्विजें स्वपद वंदितां सुमति भूप तो लाजला ।
तयाहुनि तदद्भुत-व्यसन-पावकें भाजला ॥ ३६

( द्रुतविलंबित. )

वरि दिसे मृदु मौक्तिक पोंवळें । परि न लेश तदंतर कोंवळें ॥
न तुळवे विधु, अंकित तो मळें । सरस साधुमनें शुचि कोमळें ॥ ३७

( स्रग्धरा.

मित्रासीं म्लानि देतो जरि अमृतरसालागिं हा चांद वीतो ।
साधू तैसा कसा, जो सुखवुनि सकळ प्राणियां नांदवितो ॥

---

१ सज्जनाचें अंतःकरण. २ ( पाण्यांतील ) भोंवरा. ३सूर्याच्या आप्तांना-कमळांना.

साधूंच्या दर्शनानें अशिव तिथि अशी सर्वथा आढळेना ।
साधूंचें तेज रात्रंदिव समचि न तें सोडुनी त्यां ढळेना ॥ ३८
राजा पाहोनि चक्रेंकरुनि अतिशयें ब्राह्मणा तापल्याला ।
सर्वांगीं तप्त झाला, उतरुनि मुनिचा काय तो ताप त्याला ॥
वैकुंठास्त्रासि[1] जोडी कर बहु विनवी, कोपतां फार भारी– ।
दासीं स्वामी तयाला स्वपदर पसरी हा जसा कारभारी ॥ ३९

( शार्दूलविक्रीडित )

चक्रा तूं भगवत्प्रताप सशुरा शक्रा तुवां रक्षिलें ।
नक्राचे-परि भक्तपीडनपरा वक्रा जना भक्षिलें ॥
पीडा लेश नसोचि या श्रुतिशुकीनीडा[2] मुनीला पहा ।
व्रीडाकारक विप्रगंजन तुज क्रीडारिदर्पापहा[3] ॥ ४०

( वसंततिलका )

गो-विप्र-दीन-शरणागत-याचकां मी ।
झालों असेन वश तत्पर याच कामीं ॥
तैसाचि लुब्ध जरि सत्परिशीलनातें[4] ।
तूं दीन-बांधव खरें करिशील नातें ॥ ४१

( स्रग्धरा )

रक्षाया ब्राह्मणातें सुकृत सकळही अर्पितां भूपशक्रें ।
पावोनी क्षिप्र शांती-प्रति अभय दिलें त्या द्विजा विष्णुचक्रें ॥

---

१ विष्णूच्या अस्त्राला. २ श्रुति ( वेद ) हीच शुकी ( पोपटीण ) तिचें नीड ( घरटें ); म्हणजे वेदांचें आश्रयस्थान अशा दुर्वासाला. ३ लीलेनें शत्रूचा गर्व हरण करणाऱ्या. ४ सत्सहवासाचे ठिकाणीं.

जें क्षीरांभोधि-फेनामृत-शुचि दिधलें अंबरीषा नृपातें ।
श्रोत्या वक्त्या जनाही सुयश निववितें दावुनी सत्कृपा तें ॥ ४२

( मंदाक्रांता )

श्रीरामाचा सुगुण निववी जेविं गातां शिवाला ।
श्रीदुर्वासा मुनि बहु तसा साधु-संगें निवाला ॥
भेटे भूपा-प्रति अतिशयें तो करी प्रेम हर्षे ।
पाद-प्रक्षालन नृप म्हणे तैं करूं दे महर्षे ॥ ४३

( शार्दूलविक्रीडित. )

त्या भूपासि म्हणे मुनीश्वर सुधा सेवूनि कां जीभली ।
ज्ञात्याची रसिकीं म्हणेल पुसतां गोडीस कांजी भली ॥
साधूंची तसि कीर्ति तत्सम दुजी नाहींच जीवां चवी ।
श्रोत्रीं दावुनि, दुःसहीं भवदवीं दग्धांसि जी वांचवी ॥ ४४
तूं ब्रह्मण्य, शरण्य तूं, सदय तूं, सत्कीर्तिचा चांदवा ।
लोकीं साधु तुम्ही असाचि उभवा । प्राणी सुखें नांदवा ॥
आयुर्वृद्धि असो, वसो मनिं सदा भूतानुकंपा, दिलें ।
मातें तें इतरांहि द्या यश भलें जन्मोनि संपादिलें ॥ ४५

( शालिनी )

ऐशी आशीर्वाद-पीयूषवृष्टि, केली विप्रें त्या नृपीं प्रेमदृष्टी ।
राजा लाजे, शंभुला जेविं नंदी, वारंवार श्रीमुनींद्रासि वंदी ॥ ४६

( शार्दूलविक्रीडित )

राजा त्या मुनिला म्हणे मज जडा देतां तुम्ही थोरवी ।
पादें आपुलिया जसा विधुसि कीं रत्नांसि देतो रवी ॥

---

१ क्षीरसागराच्या फेंसाळलेल्या पाण्याप्रमाणें शुभ्र ( असें सुयश ).

केला हा निजदास वासवनुता सत्कीर्तिला भाजन ।
स्वामी युष्मदुपासनेच्छु कवणा पावे न लाभा जन ॥ ४७

केला प्रार्थुनि तृप्त तो मुनि नृपें अत्यादरें जे मनीं ।
होते सिद्ध पदार्थ विप्रपतिच्या आले मुखीं जेमनीं ॥
आज्ञा दे गुरुराज त्या नृपतिला जेवावया तो मग ।
ब्रह्याच्या सदनासि जाय भगवान् भास्वान् जसा व्योमगे ४८

वर्षानंतर तापसेश्वर पुन्हा येतां गृहा पाहिला ।
तावत्काल उपोषित प्रभु-जलै प्राशूनिया राहिला ॥
आज्ञा घेउनि जेविला मग सुहृद्वर्गासवें तो भला ।
ऐसा सन्नत अंबरीष सुयशें लोकत्रयीं शोभला ॥ ४९

( स्रग्धरा )

अत्युग्र ब्रह्मशापादिकहि हरि-जना ताप नेदीच कांहीं ।
जो कोणी देव-दास-च्छळक खळ तया रक्षिता अन्य नाहीं ॥
रक्षी साधूचि येतां शरण निपटुनी त्यागितां उद्धतत्व ।
ज्ञाते हें अंबरीष-क्षितिपति-चरितीं पाहती शुद्धतत्त्व ॥ ५०

---

१ इंद्रानें स्तुत्य ( अशा सत्कीर्तीला ). २ सूर्य. ३ देवाचें तीर्थ. ४ साधूवांचून दुसरा. ५ अगदीं, पूर्णपणें.

## ८.

# श्रीधर.

हा जातीनें देशस्थ ब्राह्मण. पंढरपुराजवळील नाझरें या गांवचा राहणारा. याच्या बापाचें नांव ब्रह्मानंद व आईचें नांव सावित्रीबाई. यानें चवदावे वर्षींच संन्यास घेऊन पंढरपुरीं वास केला. याची सर्व रचना ओंवीबद्ध असून ती अत्यंत रसाळ व प्रसादयुक्त आहे. पांडवप्रताप, हरिविजय, शिवलीलामृत वगैरे याचे ग्रंथ अत्यंत लोकप्रिय असून लोक ते नेहमीं आवडीनें वाचतात. याचे ग्रंथ लोकप्रिय आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीचे नाहींत.

जन्मशक–१६००. मृत्युशक–१६५०.

---

## दृष्टि तशी सृष्टि.

श्रीकृष्णास म्हणे दुर्योधन । तुझें पांडवांवरी बहु मन ॥
तूं एवढा देव होऊन । समता[१] नसे तुझे ठायीं ॥ १
पांडवांशीं धरिसी प्रीती । तैसी आम्हांकडे नाहीं रीती ॥
तुझे ठायीं द्वैतें[२] श्रीपती । नवल मज वाटतें ॥ २
हरि म्हणे दुर्योधना । मी समसमान अवघ्या जणां ॥
एकास अधिक एकास उणा । सर्वथा नाहीं विचारीं ॥ ३
दरिद्री राजा हो कां रंक । सर्वांसि समान जैसा अर्क ॥
किंवा गंगेचें उदक । सर्वांसही सम जैसें ॥ ४
कीं सर्वां घटीं समान अंबर । कीं सर्वांसि समान जैसा समीर[३] ॥
कीं गगनीं उगवतां रोहिणीवर[४] । शीतल जैसा सर्वांतें ॥ ५

---

१ सर्वत्र सारखें प्रेम. २ भेदभाव, पक्षपात. ३ वारा. ४ चंद्र.

तैसा मी दुर्योधना असें जाण । परि जे कां कुटिल जन ॥
ते समत्वविषमत्व संपूर्ण । माझ्या ठायीं भाविती ॥ ६
जे भक्त धरिती अत्यादर । त्यांस जवळ वाटे मी यादवेंद्र ॥
मी समीप असोनि साचार । अभक्त दूरि भाविती ॥ ७
त्याची दावावया प्रचीती । दुर्योधनास म्हणे यदुपती ॥
एक कारण असे निश्चितीं । तें तूं ऐक सुयोधना ॥ ८
इतुके हे बैसले ब्राह्मण । त्यांत एक सत्पात्र निवडून ॥
लौकरीं आणीं उत्तम दान । देणें असे तयासी ॥ ९
दुर्योधन चालिला पहावया । मग बोलाविलें धर्मराया ॥
म्हणे एक द्विज नष्ट पाहूनिया । वेगें आणीं आतांची ॥ १०
धर्म जों पाहे ब्राह्मण । तों केवळ दिसती सूर्यनारायण ॥
महातपस्वी पुण्यपरायण । नष्ट एकही दिसेना ॥ ११
परतोनि आला हरीपाशीं । म्हणे अवघे आहेत पुण्यराशी ॥
अपवित्र गुण एकासी । न दिसे कोठें सर्वथा ॥ १२
इकडे दुर्योधन शोधित । अवघें ऋषिमंडळ पाहत ॥
एकही धड नाहीं त्यांत । दूषणें बहुत दिसती तया ॥ १३
हरीजवळी आला सत्वर । म्हणे अवघेचि अपवित्र ॥
एकही न दिसे सत्पात्र । दोष सर्वत्र असती पैं ॥ १४
दुर्योधनास म्हणे जगज्जीवन । तुझें हृदय कपटी मलिन ॥
सदोषिया निर्दोष जाण । त्रिभुवनींही दिसेना ॥ १५
दुरात्मा जो दुर्बुद्धि खल । त्यासि अवघे दिसती अमंगल ॥
दृष्टी कोणी न दिसे निर्मल । पापें समूल वेष्टिला ॥ १६

वेश्येचिया नयनीं । सकल स्त्रिया दिसती जारिणी ॥
तैसा दुरात्मा तूं पापखाणी । मलिन मनीं सर्वथा ॥ १७
धर्मास अवघे दिसती पुण्यवंत । तेच तुज दोषी भासत ॥
दुर्योधन न बोले तटस्थ । जो उन्मत्त विषयांध ॥ १८

---

९

## वासुदेव वामन खरे.

हे इतिहाससंशोधक, नाटककार व कवि होते. यांचें ' यशवंतराव ' या नांवाचें एक महाकाव्य असून गुणोत्कर्ष, तारामंडळ, चित्रवंचना, कृष्णकांचन, शिवसंभव इत्यादि नाटकें आहेत. हीं नाटकें भाषेच्या, रचनेच्या, परिपोषाच्या दृष्टींनीं चांगलीं असून त्यांत चारगटपणा कोठेंही नसल्यामुळें व गंभीर विचारांनीं भरलेलीं असल्यामुळें तीं आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं पाहण्यासारखीं आहेत. यांची काव्यशक्तिही चांगली होती. इतिहासाचा यांचा व्यासंग दांडगा होता. यांनीं ऐतिहासिक पत्रांचे बरेच खंड प्रसिद्ध केले असून त्यांना मार्मिक उपोद्घात जोडिले आहेत. यांची स्फुट कविताही बरीच आहे. हे मिरजेस शिक्षक होते.

जन्मसन—१८५८. मृत्युसन—१९२५.

---

### जन्मभूमि.

( श्लोक. )

पोटासाठीं भटकत जरी दूरदेशीं फिरेन ।
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन ॥
नेवो, नेतें, जड तनुस या दूर देशास दैव ।
राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव ॥ १

---

१ स्तब्ध.

या संसारीं जरि निजशिरीं वाहतों क्लेशराशी ।
चिंताज्वाला निशिदिन जरी जाळिती मन्मनासी ॥
होतें जेव्हां स्मरणच तुझें, जन्मभूमी, क्षणैक ।
तेव्हां शांत स्थिर मन कसें होतसे जाय दुःख ॥ २

वेळोवेळीं तुजसि बघुनी नेत्र संतुष्ट व्हावे ।
इच्छा होते, परि तुजकडे चित्त हेंमात्र धावे ॥
यावें देहें, परि असासि तूं शेंकडों कोस दूर ।
आहे त्याच्या त्वरित गमना विघ्न हें दुर्निवार ॥ ३

पाहें नेत्रें बहुविध असे संपदेचे पसार ।
नाना सौख्यें अनुभविति हे येथले लोक सारे ॥
येथें राहूं परि नच शिवे वासना ही मनातें ।
यावज्जीव प्रियतम अशी तूंच होशील मातें ॥ ४

जेथें माझें जनन घडलें पूर्वपुण्येंच थोर ।
जथें गेले दिवस, असतां बाळ, सौख्यांत फार ॥
जेथें होते करित वसती पूर्वज प्रेमभावें ।
कां त्या भूमिप्रति चिर न म्यां पूज्यभावें स्मरावें ॥ ५

पायोधीची श्रवणिं पडतां गर्जना मंदधीर ।
वृक्षच्छायांतरिं झुळुझुळू वाहतां वात गार ॥
होतों अंकीं निजत जननी जन्मभूमी तुझ्या ते ।
गेले कोठें दिवस ? झुरतों आठवूनी तयांतें ॥ ६

होतों लहान बहु खेळुनि तृप्त झालों ।
अंकीं तुझ्या, तिथुन थोरपणीं निघालों ॥

मातेसमीप असती, परि थोर होती ।
तेव्हां पिलें सहज सोडुन तीस जाती ॥ ७
' निःसत्त्व निर्धन ' तुला म्हणतात लोक ।
वाटे मला लवहि त्यांस नसे विवेक ॥
लक्ष्मीस देइ जननाप्रति वारिराशी ।
सेवार्थ तो सतत सिद्ध तुझ्या पदाशीं ॥ ८
बघुनि तव, अहाहा ! थोर सौंदर्य, झाले।
बहुतच दिन जेव्हां नेत्र हे फार धाले ॥
अजुनिहि दिसताहे दृष्टिला काय नव्य ।
हृदयपटीं असे तें रेखिलें चित्र भव्य ॥ ९

---

१०

# नारायण वामन टिळक.

हे धर्मानें ख्रिस्ती होते. यांची स्फुट कविता पुष्कळ असून ती ' टिळकांची कविता ' या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहे. 'वनवासी फूल,' ' सुशीला,' ' बापाचे अश्रु ' इत्यादि काव्यें मोठीं आहेत. रामायणाचे धर्तीवर ' ख्रिस्तायन ' या नांवाचें एक महाकाव्य यांनीं केलेलें आहे. ' भक्तिपर अभंग ' बरेच आहेत. यांची कविता चांगली असून भाषा गोड व ओजस्वी आहे.

जन्मसन–१८६५. मृत्युसन–१९१९.

---

## एक सुंदर कवि.

कवी! खरा हो कवी गातसे सदैव कविता नवी ।
संसृतिकोलाहलें त्रासल्या जीवाला रंजवी ॥
पुनरावृत्ती दोष म्हणा हो कुणी पाहिजे तरी ।
विविधार्थांची गिरा द्विजाची मनोहरा मज खरी ॥
मीच कशाला? दिशा हांसती, शिरा तरू डोलवी ।
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी ॥
एका तरुला कुशल विचारी, दुसऱ्याला हांसवी ।
करि रोमांचित एक लतेला, दुसरीला लाजवी ॥
फुलांसंगतीं खेळे ओंव्या गाउनि त्यां खेळवी ।
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी ॥
क्षणांत वरतीं, क्षणांत खालीं, स्फूर्ति यास नेतसे ।
अंतर्यामीं क्षणांत गातो हंसतो फूलचि जसें ॥
लीला त्याच्या सांगति कीं हा कवी खरा सत्कवी ।
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी ॥
निंदास्तुतिच्या सवद्यासाठीं रचना याची नसे ।
भक्तिरसीं हा निमग्न याला स्फूर्ति देव देतसे ॥
कविता माझी जळो! मला हा पक्षिराय लाजवी ।
'हीच वृत्ति दे,' प्रभुपाशीं हें मजकडुनी मागवी ॥

— —

११

## केशवसुत.

यांचें खरें नांव कृष्णाजी केशव दामले. यांचे वडील कोकणांत शाळामास्तर होते. शिक्षण मॅट्रिकपर्यंत पुण्याचे न्यू स्कुलांत झालें. हे स्वतःही शिक्षकच होते. यांचें आयुष्य सांपत्तिक बाजूनें दैन्यांत गेलें; पण प्रतिभेची श्रीमंती यांना दांडगी लाभली होती. वृत्ति नेहमीं विचारमग्न, त्यामुळें स्वभाव कांहींसा एकलकोंडा. यांची कविता स्फुट आहे. मराठी कवितेला यांनींच पहिल्यानें अगदीं नवीन वळण दिलें. नवीन प्रगतिपर विचार अत्यंत जोरदार व सडेतोड भाषेंत मांडून समाजाला खडबडविण्याकरितां यांनीं आपल्या उज्ज्वल प्रतिभेचा चांगलाच उपयोग केला. यांच्या कवितेंत आवेश व कळकळ हीं मूर्तिमंत दिसतात. शब्दसौष्ठव बेताचेंच. यांचें अनुकरण बरेंच झालें आहे.

जन्मसन–१८६५. मृत्युसन–१९०५.

## कांट्यांवांचुनि गुलाब नाहीं.

साकी

कांट्यांवांचुनि गुलाब नाहीं हें धर हृदयीं साच ।
नैराश्याचा मग तुजला तो होइल न कधीं जाच ॥ १

सुखदुःखें हीं मिश्रित ऐशीं असतीं नित्य जगांत ।
सुखाकारणें झटतां पडतें दुःख पहा पदरांत ॥ २

छायेवांचुनि कधीं प्रभा ती कुणीं पाहिली काय ।
चित्र होतसे, जेव्हां छाया प्रभेस मिळुनी जाय ॥ ३

स्पृहणीय असें काय जगीं या एक असे ?–तर प्रीत ।
हृदयभेदकर फार काय हो ?–तर ताच हें खचीत ॥ ४

अविकृत ऐसें नसेचि कांहीं, विकृतिरूप संसार ।
ओळखुनी हें सोडुनि देईं शोकदुःख अनिवार ॥ ५

---

## १२

# गोविंदाग्रज.

खरें नांव राम गणेश गडकरी. शिक्षण कॉलेजचें पहिलें वर्ष. कांहीं दिवस शिक्षकाचें काम केलें; पुढें केवळ लेखनव्यवसायच केला. वृत्ति आनंदी, स्वभाव विनोदी. केशवसुतांच्या संप्रदायांत यांची गणना प्रमुखत्वानें होते. गुरूप्रमाणें यांची प्रतिभाही दांडगीच होती. सर्व कविता स्फुट. हे नाटककारही होते. प्रमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन, राजसंन्यास व वेड्यांचा बाजार हीं यांचीं नाटकें असून तीं लोकप्रिय आहेत. यांचे स्फुट विनोदी लेखही बरेच असून ते ' रिकामपणची कामगिरी ' या नांवानें प्रसिद्ध आहेत. आपल्या अल्पायुष्यांत वाङ्मयप्रेमी लोकांना चांगलाच चटका लावून हे गेले.

जन्मसन–१८८५. मृत्युसन–१९१९.

---

## मंगलाचरण.

( शार्दूलविक्रीडित. )

स्वानंदें नटला अनंतगुण जो या वस्तुमात्रांतरीं ।
कल्पान्तीं स्थल ज्या परंतु पुरतें एकाच पत्रावरी ॥
ज्यालागीं स्तवितां यथार्थ वदती वेद श्रमानें ' अलम् ' ॥
तो श्रीमान् जगदीश मंगलदृशा कुर्यात् सदा मंगलम् । १
योगाभ्यासपरा, समाधिनिरता, वा शास्त्ररत्नाकरा ।
जो तूं लभ्य नव्हेस, त्या तुज कसें आम्ही धरूं ईश्वरा ॥

---

१ प्रळयकाळीं. २ जगप्रळयानंतर परमात्मा वडाच्या पानाच्या आश्रयानें राहतो, अशी समजूत आहे. ३ बस्स! पुरे! ४ दृष्टीनें.

लीलाजीवन हेंच पूजन तुझें आम्हां कळे बालकां ।
केलें अर्पण तें तुझ्या पदिं मुदें देवा जगच्चालका ॥ २
शालामंदिरिं मांडिती चिमुकलीं बाळें नवा खेळ हा ।
दृष्ट्या कौतुकपूर्ण विश्वजनका ! तूं सर्वदां त्या पहा ॥
आशीर्वादबलें त्वदीय सदया ! ने दूर तापत्रयी[2] ।
स्वाध्यायासह[3] वाढवीं शिशुजनीं क्रीडा सदा वाङ्मयी[4] ॥ ३
रक्षी मोहर जी तरूवरि पुढें होती फळें तोंवरी[5] ;
सांभाळी कलिका लतांवरि; फुलें कालें तयांचीं करी ॥
भूगर्भीं नवबीजरक्षण करी आवृष्टि जी सर्व-दा[6] ।
देवा ! त्या शुभदृष्टिनें शिशुगणा या पाहणें सर्वदा ॥ ४

---

## १३

# चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे.

## ( चंद्रशेखर )

हे बडोद्यास राहणारे आहेत. यांची स्फुट कविता पुष्कळ आहे; पण विखुरलेली आहे. ती सर्व रम्य कल्पनांनीं नटलेली असून भाषाही चांगली आहे; पण कांहीं ठिकाणीं बरीच कठिण आहे.

जन्मसन–१८७१.

---

१ आनंदानें. २ आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक दुःखें. ३ आपले रोजचे पाठ, अभ्यास. ४ विद्येची, ज्ञानसंबंधी. ५ वर्षाकालापर्यंत. ६ सर्व कांहीं देणारी ( अशी दृष्टि ).

# स्नेहाची थोरवी.

## आर्या.

आरामें[1] निज वयाचो[2] जरि दुःखाच्या बहु प्रकारांनीं ।
व्यापुनि गमे यमाच्या अंध तमाच्याच गवसलों रानीं ॥ १
जरि विकट संकटाचे भेदुनि विव्हळ विलाप कानांला ।
आपण थिजोनि गेलों, जणुं कीं नाहींच देह भानाला ॥ २
तरि आपणांस असतां कोणी स्नेही खरा जिव्हाळ्याचा ।
संजीवनास[3] देतो, अमृतानल[4] तो जणों हिंवाळ्याचा ॥ ३
हें स्नेहरूप[5] शामक[6] दुःखाच्या वेदना लया नेतें ।
खवळोनि शोकसागर जातां त्यालाहि शांतता देतें ॥ ४
स्नेहापासुनि पावे जन्म अहो! गोड गोड कळकळ ता ।
जी कालभार हलका करिते, त्याची गतीहि वेगवती[7] ॥ ५
प्याला दुःखविषाचा प्याला केवळ परार्थ जो त्याला ।
त्यालाच जाणतों मी 'स्नेही' हें थोर पद न भलत्याला ॥ ६
स्नेहीच दुःखिताचा असतो, दुसरा तसा न कनवाळू ।
तेल तिळांतुनि मिळतें, मिळेल गाळूनि काय तें वाळू ॥ ७
अन्यगुणादर[8] करणें स्वभाव हा ज्या मनांतुनी वागे ।
स्नेहज्योति: तयांतचि दिव्यें[9] विजेच्या दिव्यापरी जागे[10] ॥ ८

---

१ सुख, आनंद; उपवन. २ जीविताचा कोणताही काल. ३ नवा उत्साह. ४ सुखावह असा अग्नि. ५ प्रेम, पक्षीं तेल. ६ दुःखाचें शमन करणारा–शांति देणारा उपाय. ७ चंपल. ८ दुसऱ्याच्या गुणासंबंधानें पूज्यतेची, आनंदाची, किंवा संतोषाची भावना. ९ चकचकीत, झगझगीत, तेजस्वी. १० तेवत असते.

करितात जे मनोलय[1] आकाशांतील सुप्रकाशांत[2] ।
म्हणतात ते मुनी कीं, स्नेह सुखाचें पदैक तें शांत ॥ ९
तरि खिन्न मृत्युलोकीं निजदिव्योत्साह[3] खेळवायाला ।
स्नेहावतरण[4] झालें; वाटे अभिमान, मौज गायाला ॥ १०
येथें येउनि त्यानें हा हृदयें किति पसंत मंतरिलीं[5] ।
ह्या नयनीं त्या तारा-नाथें[6] स्वानंदचंद्रिका[7] भरिली ॥ ११
वाटे तो परमात्मा जीव इथे पाठवी तया कालीं ।
विमल स्नेह-सुखाचें दिव्य असें कवच[8] त्याजला घाली ॥ १२
प्राणी त्राण जरी हें येतो घेऊनि येथ येतांना ।
तेज[9], प्रभाव त्यांतिल नेतो मृत्यू तयास नेतांना ॥ १३
स्नेहाविण गुण सारे फिके!—भयानें सळून[10] पडतात ।
शांतिस्तव ममतेच्या ठायीं जाउनि पळून दडतात ॥ १४
त्याविण धर्म दुरावे, कृष्ण-कुहू[11]-रात्र होय त्याभंवतीं ।
आनंद-दीप लोपे, हृदय गमे शून्य झोंपडें गवतीं ॥ १५
जवळून[12] आपणांतें धरिती जा बंधनें समजाचीं ।
स्नेहावांचुनि भंगुर[13], तींच तटातट तुटोनि जायाचीं ॥ १६

---

१ मनाची धारणा—एकाग्रता. २ दिव्य तेजांत—परमात्म्यांत. ३ आपला निर्मल आनंद. ४ स्नेहाचा—प्रेमाचा जन्म. ५ भारवून टाकलीं, वश करून घेतलीं. ६ चंद्रानें. ७ आपली मोहक ज्योत्स्ना. ८ आवरण. ९ खऱ्या प्रेमावर मृत्यूवांचून कोणाची सत्ता चालत नाहीं, तें मृत्यूबरोबरच मूळच्या दिव्य ज्योतींत त्यास जातें, असा भाव. १० होरपळून, म्लान होऊन. ११ अमावास्या. १२ घट्ट आंवळून. १३ ठिसूळ, कुजकीं, निर्जीव.

मग असिपत्रवनासम[1] दिसति जगांतील घोर देखावे ।
केवळ भाऊ-गर्दी[2] ! तेथें कोणी कुणास लेखावें ॥ १७

स्नेहावांचुनि मानव, हे होती श्वापदांहुनी झोड[3] ।
करिती परस्परांची ढवळ्या दिवसाहि लांडगेतोड[4] ॥ १८

स्थिति किति कठिण असेना स्नेह जणों भारुनी तिला फिरवी।
अस्मानी चष्मा तो चंडातप[5] चंद्रिकेपरी मिरवी ॥ १९

क्षारोदधी खवळतो, प्रलयघना[6]तुल्य गर्जना करितो ।
तरि तो सुधाकराच्या[7] उदयानें मौन, शांतता धरितो ॥ २०

स्वदिवंगतमित्राच्या[8] शोकें मनिं भाव ये विरक्तीचा[9] ।
उजळे हृदयीं नंदा-दीप[10] स्नेहाळ[11] देव-भक्तीचा ॥ २१

भक्तानं ही पृथिवी स्वर्गाला जरि कदापि नर नेतो ।
स्नेहें तरि तो स्वर्गचि पृथिवीला झेंप[12] घालुनि येतो ॥ २२

ह्या स्नेह-दीपकांची आरास न हृदय-मंदिरीं केली ।
तीं माणसें अभागी, दुर्मुखलेलीं[13], जिवंत मेलेलीं ॥ २३

---

१ तरवारींच्या पात्यांचें जंगल. २ पानपतास शेवटीं भाऊंनीं निराशेनें बेहोष होऊन युद्धाची निकरानें गर्दी उडविली, त्याप्रमाणें जग जर स्नेहशून्य झालें, तर जिकडे तिकडे मारामाऱ्या होतील, आपपरभाव राहणार नाहीं, व सर्व जगाला रक्तपाताच्या भयाण देखाव्याचें स्वरूप प्राप्त होईल, असा भाव. ३ उच्छृंखल, स्वैर, आडदांड. ४ कापाकापी, हत्या. ५ प्रखर ऊन-निळा चष्मा ज्याप्रमाणें प्रखर उनाला चांदण्याचें स्वरूप देतो, त्याप्रमाणें स्नेह दुःसह स्थिति सुसह करितो. ६ प्रळयकाळच्या मेघाप्रमाणें. ७ चंद्राच्या. ८ आपल्या स्वर्गवासी मित्राच्या. ९ वैराग्याचा, त्यागाचा. १० देवीपुढें अहोरात्र तेवणारा दिवा; सतत तेवणारा दिवा. ११ प्रेमल, नैष्ठिक, निर्मल. १२ उडी. १३ उदास, अप्रसन्न-मुखाची, खिन्न.

प्रारब्धां[1]च्या चात्या या विश्वाच्या विशाल गिरणींत ।
[2]कालगतीनें फिरती, त्यांची संख्याहि कल्पनातीत[3] ॥ २४

जीवनें[4]चरित्रसूत्रें त्यांपासुनि उकलती[5] परोपरि तीं ।
इष्ट [6]जगत्-शेठातें वस्त्रें क्रियमाण[7] तींच तीं करिती ॥ २५

जीव मजूर बिचारे! या व्यवसायें न काय हो! दमती ।
स्नेहाच्या ग[8]मतीनें दमतां आयास भासती कमती ॥ २६

ज्या खडकावरि जमलें, स्वार्थाचें बुळबुळीत शेवाळें ।
भोंतीं खल[9]वृत्तींच्या जलवेलींचेंच माजलें जाळें ॥ २७

पाषाण-हृदय ऐसे जे जन दुं[10]र्धर म[11]मत्व-मायेतें ।
शीत[12]ळें परदुःखातें पाहुनि ज्यांचें हंसें उता येतें ॥ २८

---

१ प्राक्तनकर्म, पूर्वजन्मार्जित कर्म. २ कालानें दिलेल्या गतीनें. ३ कल्पनेनें जाणतां न येणारी, अगणित.—यंत्रगतीमुळें गिरणींत ज्याप्रमाणें अनेक चात्या फिरत असतात, त्याप्रमाणें कालानुसार प्राक्तनकर्माचीं फळें भोगण्याकरितां अनंत जीवात्मे या जगांत वावरत असतात. ४ आयुष्यक्रम हींच सुतें. ५ निर्माण होतात. ६ विश्वरूपी गिरणीचा मालक. ७ चालू जन्मांतील कर्म, पक्षीं तयार.—फिरणाऱ्या चात्यांपासून ज्याप्रमाणें निरनिराळ्या प्रतीचें सूत निघतें व त्या सुतापासून हवीं तशीं वस्त्रें ज्याप्रमाणें गिरणीच्या मालकाला तयार होऊन मिळतात, त्याप्रमाणें जीवात्मे प्रारब्धभोग भोगतांना स्वैराचरण करितात, त्यामुळें क्रियमाण तयार होऊन विश्व चालविणाऱ्या परमात्म्याला तें चालविण्याला इष्ट अशी स्थिति प्राप्त होते व त्याचा सृष्टिक्रम चालू राहतो. ८ मौज, आनंद, सुख. ९ दुष्टवासनांचें. १० दुर्वश. ११ आपलेपणा व माया यांना; किंवा आपलेपणानें उत्पन्न झालेल्या मायेला. १२ दुसऱ्यांच्या दुःखाची आंच न लागल्यामुळें ज्यांना त्यांच्या दुःखाचें कांहीं वाटत नाहीं, उलट तें दुःख पाहून हसूंच येतें.

त्यांचें अगत्य आदर विनयी[1] स्नेहास कोठुनी राहे ।
स्नेहें दूरुनि त्यांना सदा नमस्कार ठोकिला आहे ॥ २९
स्नेह कधींहि तयांशीं नहि सरकते[2] वांटणी करायाचा ।
प्रांजळ[3] सहानुभूती दावुनि त्यांना न आर्जवायां[4]चा ॥ ३०
स्नेही, स्वार्थपरायण, यांचें आहे वियोग हें नातें ।
[5]स्व-स्व-गुणाधिक्यानें हें नातेंमात्र लांबलें जातें ॥ ३१
रत निजहितांत झाले, जे गेले बोंथटून गोठून ।
ठेवा स्वानंदाचा देइल हा स्नेह त्यांस कोठून ॥ ३२
न[6]वनीतकोमलांना हितगुज सांगे विमुक्तहृ[7]दयानें ।
त्यावरि सहर्ष वर्षति या स्नेहाचीं अमोल वरदानें ॥ ३३
पुं[8]ड नरास निवारी, लेशहि मधु, सु[9]मन हें न दाखवितें ।
परि निज मधमाशांना सुरसं[10]कुंतूहल यथेष्ट चाखवितें ॥ ३४

———०———

१ कोमल वृत्तींच्या स्नेहाला अशा लोकांबद्दल कां कळकळ वाटावी? २ भागीदारी. ३ निर्व्याज, निष्कपट. ४ मनधरणी करावयाचा. ५ स्नेही व स्वार्थी यांच्यांत स्नेहाचा व स्वार्थाचा ज्या मानानें उत्कर्ष, त्या मानानें ते एकमेकांपासून दूर. ६ लोण्याप्रमाणें मऊ. ७ मोकळ्या अंतःकरणानें.-लोण्याप्रमाणें मऊ अंतःकरणाच्या मनुष्याशीं आपलें अंतःकरण उघडें करून जो दाखवितो. ८ आडदांड; दयामायाशून्य. ९ स्नेहपूर्ण मन: पक्षीं फूल. १० मधुरसाची गोडी; पक्षीं प्रेमानंद.

१४

# भास्कर रामचंद्र तांबे.

यांचें घराणें मूळ कोंकणांतलें पुढें यांचे पूर्वज उत्तर-हिंदुस्थानांत जाऊन जहागीरदार बनले. यांचा जन्म ग्वालेर संस्थानांतील एका गांवीं सन १८७४ सालीं झाला. मॅट्रिकपर्यंत शिक्षण; तें देवास येथें झालें. यांचा स्वभाव लहानपणापासून मोठा मानी, करारी, निःस्पृह, हूड व चिकित्सक आहे. कविता करण्याचा नाद अगदीं लहानपणापासून. ईश्वरभक्ति, विद्याभिरुचि, भूतदया, इत्यादि उत्तम गुण यांचे आंगीं आहेत. यांना हिंदी, संस्कृत, इंग्रजी व उर्दू या भाषा चांगल्या येतात. देवास, इंदूर, पिंपळजा वगैरे संस्थानांत यांनीं हुद्द्यांचीं कामें केलीं असून हल्लीं हे ग्वालेर संस्थानांत शिक्षणखात्यांत आहेत. यांची कविता स्फुट असून ती एकत्र छापलेली आहे. प्रसाद, अर्थगौरव व भाषासौष्ठव या गुणांनीं ती युक्त आहे. शृंगार व करुण हे रस यांचे आवडते दिसतात. मात्र यांचा शृंगार भारदस्त व निष्कलंक आहे.

---

## गुराख्याचें गाणें.

चालः—( भला जन्म हा. )

कुरणावरतीं वडाखालतीं गाइ वळत बैसतों—  
मजेनें गाइ वळत बैसतों ।  
स्फटिकापरि निर्मळ हा खळखळ झरा जवळ वाहतो ॥ ध्रु ॥

पावा फुंकुनि मंजळ नादें रान भरुनि टाकितों—  
हिरवें रान भरुनि टाकितों !  
आनंदानें डोळे भरतां प्रभुजीला प्रार्थितों !

गाईमागें रानोमाळीं शीळ भरत हिंडतों—
कधिकधीं शीळ भरत हिंडतों !
दऱ्या, खोऱ्या, राई, ओहळावरी मौज मारितों !
उनाची भीती कवणाला ?
पाउस काय करिल तो मजला ?
भीतों कोठें मी थंडीला ?
श्रीमंतापरि गरिबा कोठें वारा तो दुखवितो ?—
गरिबा वारा नच दुखवितो !
देवाजीवरि सदा हवाला टाकुनि मी राहतों ! १
तृषा लागतां नीर झऱ्याचें ओंजळिनें मी पितों—
निर्मळ ओंजळिनें मी पितों !
क्षुधा लागतां कांदा-भाकर यथेच्छ मी जेवितों !
फिरतां फिरतां करवंदेंही तोडुनि मी भक्षितों—
रानीं तोडुनि मी भक्षितों !
काठीनें मी कांटे दाबुनि बोरेंही तोडितों !
धनिका ताट रुप्याचें जरी,
पांचही पक्वान्नें त्यावरी,
नाहीं गोडि मुखाला परी !
गाईसंगें हिंडुनि रानीं थकुनि सुखें जेवितों—
जाडेंभरडें खाउनि धनिकाहूनि अधिक तोषतों !
पुच्छ उभारुनि थवा गाइंचा ज्या वेळीं नाचतो—
मजेनें ज्या वेळीं नाचतो,
मोरमुकुट बन्सीवाल्यापरि मौज उभा पाहतों !

दा. क. 3446

ओहळावरतीं थवा तयांचा पाणी जेव्हां पितो—
निर्मळ पाणी जेव्हां पितो,
उभा राहुनी प्रेमें त्यांना शीळ अहा घालितों!
कशाला मंदिल मज भरजरी?
घोंगडी अवडे काळी शिरीं!
दंड करिं गाइ राखण्या परी!
कुवासना घालिति धिंगा तो महाल मी टाकितों—
नृपाचा महाल मी टाकितों!
गाईसंगें हवेंत ताज्या नित्याचि मीं राहतों! २
क्रोध, काम, मद, मत्सर यांहीं गांव सदा गर्जतो--
भांडणें गांव सदा गर्जतो!
दूर टाकुनी त्यास शांतिनें सुखें दिवस लोटितों!
समाधान हा परिस अहा! मज रानांतचि लाभतो—
अहा! मज रानांतचि लाभतो!
दुःखाच्या लोहास लावितां सुख—सोनें बनवितो!
चढल्या पडावयाची भिती,
गरिबा अहंकृति काय ती?
काय करि त्याचें खोटी स्तुती?
परवशतेच्या बिड्या रुप्याच्या पायांत न बांधितों—
मृदुल तरि पायांत न घालितों!
निज हृदयाचा धनी धरिणिचें धिनित्व अवमानितों! ३

## १५

# नरसिंह चिंतामण केळकर.

प्रसिद्ध 'केसरी' पत्राचे संपादक व महाराष्ट्राचे पुढारी असल्यामुळें हे सर्व-परिचित आहेत. हे राजकारणांत मुरलेले आहेत; सरस्वतीचे दांडगे उपासक आहेत. यांची बहुश्रुतता व मार्मिकता वाखाणण्यासारखी आहे. हे कवि, निबंध-कार, नाटककार व मार्मिक टीकाकार आहेत. यांची प्रतिभा फारच उज्ज्वल आहे. यांचे गद्यलेखही खुसखुशीत विनोदानें व काव्यमय कल्पनांनीं नटलेले असतात. तोतयाचें बंड, कृष्णार्जुनयुद्ध, चंद्रगुप्त, वीरविडंबन हीं यांचीं नाटकें असून तीं वाङ्मयदृष्ट्या उत्तम आहेत. सुभाषित व विनोद, लोकमान्यांचें चरित्र, ग्यारिबाल्डीचें चरित्र, स्वराज्याची कैफियत, इंग्रज व मराठे, इत्यादि यांचे ऐतिहासिक, चरित्रात्मक व राजकीय ग्रंथ सर्वमान्य आहेत. किरकोळ लेख तर पुष्कळच आहेत. त्यांपैकीं कांहीं पुस्तकरूपानें निघाले आहेत. यांची स्फुट कविता पुष्कळ आहे. ती भाषासौष्ठव, अर्थगांभीर्य, विविध अलंकार यांनीं सज-लेली आहे. जन्मसन–१८७२.

---

### झिम् झिम् पाऊस !

(राग–मेघमल्हार.)

मेघ अमृतमय घालि सडे ।
झिम् झिम् झिम् पर्जन्य पडे ॥
गमत गगन जणुं, मिटुनि नयन अणु ।
करुनि मलिन मुख करुण रडे ॥ झि झि०॥ ध्रु० ॥

वन जमले बहु दाट भरारा ।
वायु हालवी वृक्ष थरारा ॥
हरिणगण पहा अशनिरवेंभयें[1] ।
घनकुंजांतरिं शिरुनि दडे ॥ झिम् झिम्० ॥ १
दिशिं दिशिं सुचपल वीज चकाकत ।
निज तेजें करि दृष्टी विफलित ॥
परि रंगित पसरोनि पिसारा ।
मयूर किति नाचत मुरडे ॥ झिम् झिम्० ॥ २
दिव्य रथावरि इंद्र धनुर्धर ।
बसुनि सोडितां सर सर सर शर ॥
ग्रीष्म-वीर-रिपु होउनि जर्जर ।
शरण येउनी चरणिं पडे ॥ झिम् झिम्० ॥ ३

---

## १६

# गोपाळ गोविंद मुजुमदार.

## (साधुदास)

हे कवि सांगलीचे राहणारे असून तेथेंच हल्लीं शिक्षकाचें काम करीत आहेत. यांनीं 'वनविहार' व 'रणविहार' या नांवाचीं दोन काव्यें रामायणांतील भागावर लिहिली असून तीं नितांत रमणीय आहेत. भाषा गोड व दोन्ही प्रकारच्या अलंकारांनीं पूर्ण नटलेली आहे. कांहीं स्तोत्रेंही यांचीं आहेत; तींही प्रेमळ आहेत. स्फुट कविताही बरीच आहे. जन्मसन–१८८४.

---

१ मेघगर्जनेच्या भीतीनें.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ... ठाणे.

## लक्ष्मणपरीक्षा.

वंशस्थ.

फलोपलब्धिच्छल दर्शवूनिया वनांत गेला रघुनाथ एकदां ।
सलक्ष्मणा पर्णकुटीत राहिली धरात्मजा विश्वमनोहरा तदा ॥ १

न भृंग गाई, न समीर वाहतो, मृगी न हिंडे, शुक मूक राहिला ।
दिनातपीं व्याकुल सृष्टिसुंदरी गमे जणों सेवित वामकुक्षिला ॥ २

सुरम्य कुंजीं उटजांगणांतल्या रमे तदा लक्ष्मण योगसाधनीं ।
शिलेवरी ठेवुनिया स्वमस्तका अदूर ठेली रघुनाथकामिनी ॥ ३

निजेश्वराच्या असतां पथाकडे तथाविधा लावुनि दृष्टि राहिली ।
क्रमें क्रमें तेथ निमीलितेक्षणा क्षणांत ती निद्रित पूर्ण जाहली ॥ ४

अपूर्व-माधुर्यगुणें तयास तों करीत जी विस्मित सस्मिताक्षरा ।
समीपवृक्षावरुनी पडे अशी तदीय कर्णीं स्फुट मानवी गिरा ॥ ५

वनीं अशा या समयीं कुठून ही मनुष्यवाणी पडली श्रुतींवरी ।
पहावया तें उघडूनि लोचनां इतस्तता दृष्टिनिपात तो करी ॥ ६

परिस्फुरच्छोणितचंचु तों वरी रसालशाखेवरि उंच बैसला ।
समीप ऐसा शुक एक लक्ष्मणें निजेक्षणीं प्रेरितदृष्टि पाहिला ॥ ७

---

१ फळें आणण्याचें निमित्त. २ भूमिजा, सीता. ३ ( आपल्या गुणसौंदर्यानें ) त्रिभुवनाला मोहनी घालणारी. ४ दिवसाच्या उन्हानें. ५ पर्णकुटीच्या आंगणांतील. ६ परमात्मचिंतनांत. ७ जवळच. ८ मिटले आहेत डोळे जिचे.— हळुहळू डोळे मिटतां मिटतां क्षणांत तिला गाढ निद्रा लागली. ९ स्मितपूर्वक जिचीं अक्षरें उच्चारलीं आहेत अशी ( गिरा ). १० स्पष्ट. ११ कानांवर. १२ इकडेतिकडे. १३ ज्याची लाल चोंच ( बोलण्याकरितां ) फुरफुरत आहे असा ( शुक ). १४ आंबा. १५ आपल्या नजरेकडे ज्यानें नजर लाविली आहे असा.

हरिच्छवि[1] प्रस्फुटकंठमंडल[2] क्षणोक्षणीं पंख वळूनि खाजवी ।
प्रगल्भ-वाक्पाटव[3] दाखवोनिया नरासही तो शुकराज लाजवी ॥ ८
अहो कृती[4] भाससि तूं नरोत्तमा कृती तुझी ही ललना वराकृती[5] ।
परस्परां योग्य तुम्हांस जो सृजी तया विधीची बहु योग्य ही कृती ॥९
तदा शुकाचें परिसूनि वाक्य तें निजाननें सस्मितदंतमंडितें[6] ।
तयास ऐसें प्रतिवाक्य[7] अर्पिलें खगोत्तमा वीरकुलैकपंडितें[8] ॥ १०
विदग्धवाचानिपुणा[9] विहंगमा मदर्थ जें तूं वदलास संप्रति ।
असे जरी योग्य तथापि मन्मना तयांतुनी वस्तुविरोध[10] भासती ॥ ११
असें कृती मी परि ही मदंगना न, किंतु माता करिते कृती मला ।
अयोनिजा[11] ही मिथिलेशकन्यका रघूत्तमाची रमणीय चित्कला[12] ॥ १२
कृती विधाता म्हणतोसि, तें खरें, परंतु तो निर्मुनिमात्र ना हिला ।
स्वयंभु आदर्श[13] हिच्या मिषें मिळे म्हणूनिया होउनि धन्य राहिला ॥ १३
म्हणून ही मज्जननी शुकोत्तमा, मदग्रजाची[14] रमणी विलासिनी[15], ।
त्रपाकटाक्षें[16] मजला न मोहिते कृपाकटाक्षें परि पोषिते वनीं ॥ १४
विलासभोगास्तव यांस पंडिता ! वनागमीं हेतु न जाहली रती ।
करावया जनकोक्ति सार्थ हीं वनेचरें वल्कलवास[17] दंपती[18] ॥ १५

---

१ हिरव्या रंगाचा. २ कंठ फुटलेला. ३ प्रौढभाषणनैपुण्य. ४ धन्य. ५ सुंदर. ६ हास्ययुक्त दांतांनीं शोभणाऱ्या. ७ प्रत्युत्तर. ८ वीरकुलांतील असामान्य पंडितानें. ९ सुज्ञवाक्पटु. १० वस्तुस्थितीचे विपर्यास. ११ कोणत्याही आईच्या उदरांतून जन्म न पावलेली, स्वयंभू. १२ ज्ञानकला–प्रिय स्त्री. १३ नमुना. इतर सुंदर स्त्रिया निर्माण करण्याला हा आपला एक आयताच छानदार नमुना मिळाला, म्हणून तो ( विधाता) आपल्याला धन्य मानतो, हा भाव. १४ माझ्या ज्येष्ठ भ्रात्याची. १५ सुंदर. १६ सलज्ज कटाक्षानें. १७ वल्कलें नेसलेलीं. १८ नवराबायको.

वदूनि ऐसें प्रतिवाक्य साधु तो पुनश्च झाला रत आत्मसाधनीं ।
शुकें तदा डोलविलें स्वमस्तका परंतु नेणे कवि काय कारणीं ॥ १६
त्यजूनि तैसा मग भाषणौघ तो शकें वचा मार्ग दुजाच काढला ।
नरोत्तमा सादर हाक मारुनी असें तदा वाक्य तयास बोलला ॥ १७
तरी मनीं तूंच विचार लक्ष्मणा त्यजूनि राज्यादिक सर्व वैभवा ।
वनांत जो या रघुनाथ पातला नव्हे कसा तो अतिमूढधी युवा ॥ १८
वधूविलासीं रमला सदैव जो तया पित्याचे वर मोहदत्त ते ।
गणूनि जो वंद्य वनास सेवितो तयास हें योग्य न राज्य आयतें ॥ १९
तथापि धर्मास्तव कर्म मान्य हें जरी तयाचें क्षण एक मानिलें ।
तरी वधूरत्न वनांत कष्टवी असें तुवां कर्म कसें समर्थिलें ॥ २०
महार्घवस्त्राभरणीं विभूषिता वधू जिला पौर तटस्थ पाहती ।
विलोकुनी तीस कुवल्कलांबरा मदीय नेत्रांतुनि अश्रु वाहती ॥ २१
असेंहि तूं आणिक आण मानसीं, विदेहभूपें दिधली स्वनंदिनी ।
त्वदग्रजा, ती वनवास सेवना सुखोपभोगा अथवा विलोकुनी ॥ २२
बघूनिया दुःस्थिति ही सुदुर्धरा स्वकन्यकेची निजचित्तभेदिनी ।
नितांत शोकें बघ आजि सोडिते अशीत निश्वास न काय मेदिनी ॥ २३
विशालनेत्रा कमनीयविग्रहा वधू कुठे राम कुठे वरांक तो ।
अहो तयांचा मज योग पद्मिनी-कृशानु-योगापरि वाम भासतो ॥ २४

---

१ आत्मचिंतनांत. २ महामूर्ख. ३ स्त्रीलंपट–स्त्रैण झाला. ४ मोहानें दिलेले. ५ पुष्टि–संमति दिलीस. ६ बहुमोल. ७ विस्मित. ८ जनकानें. ९ हृदयविदारी. १० उष्ण. ११ मनोहर आहे आकृति जिची. १२ दरिद्री, भिकार; नीच. १३ कमलिनी व अग्नि यांच्या संयोगाप्रमाणें. १४ विषम, प्रतिकूल.

तयासवें काननिं राहतां तुझी उदारता ये दिसुनी तयाप्रती ।
परंतु जो कष्टवितो तुला सदा तदीय नीति कुटिला न काय ती ॥ २५
करूनि कौटिल्य खलास वंचिजे असा असे न्याय जगांत लक्ष्मणा ।
म्हणूनि साकेतपुरीस जाय तूं हरूनिया हीं युवती सुलक्षणा ॥ २६
घडेल कीं कर्म न गर्हणीय हें अशी कुशंका जरि जाहली तुला ।
परांगनां- धर्षण सर्वसंमत क्षितींत आहे तरि राजसा कुला ॥ २७
हरूनि नेतां रमणीललाम हे घडेन मी भाजन रामशासना ।
असा मनीं संशय आणिसी जरी कथीन मी युक्ति तदीय वारणा ॥२८
दिली असे शक्ति अमोघविक्रमा ममेश्वरें खेचरनायकें मला ।
तिच्या बळें तूं रघुनायका त्वरें वधून टाकीं नव-पुष्प-कोमला ॥२९
प्रवृत्त नोहे मति ही तुझी जरी स्वबंधुघातीं अथवा दयावती ।
हरूनि हीतें तरि सेविं मत्पुरी सुदुष्प्रवेश्या रघुनायकास ती ॥ ३०
असो तुला जें हितसार काढुनी शुभेप्सितें येथवरी निवेदिलें ।
पुनःपुन्हा चिंतुनि तें निजांतरीं पहा मतीतें तव काय मानलें ॥ ३१
वदूनि ऐसें शुक वाक्य लक्ष्मणा तदुत्तराकांक्षिमनें विरामला ।
क्षणैक शाखेवरि, वीर संयमी तथापि तो तेथ उगाच राहिला ॥ ३२

---

१ ठकवावें. २ अयोध्येस. ३ निंद्य. ४ परस्त्रीचें हरण. ५ राजांच्या ( क्षत्रियांच्या ) कुळाला. ६ स्त्रीरत्न. ७ पात्र. ८ रामकृत दंडाला, ९ अचूक आहे पराक्रम जिचा अशी ( शक्ति ). १० माझ्या स्वामीनें. ११ यक्षांच्या राजानें. १२ ताज्या फुलाप्रमाणें कोमल. १३ अत्यंत दुर्गम. १४ हितांतलें हित, हितसर्वस्व. १५ सदिच्छेनें, सद्धेतूनें. १६ त्याचें उत्तर ऐकण्याच्या इच्छेनें. १७ इंद्रियनिग्रही.

विलोकितो जों शुक लक्ष्मणाकडे तयास तों गोचरमात्र जाहला ।
क्षतीं तयाचा अधरोष्ठ रक्त तो नितांत कोपें बहु कंप पावला ॥ ३३

अगाधही शांति तदीय सर्वथा तया प्रसंगीं ठरलीच ती वृथा ।
समीरणें ज्यो खवळे महोदधी न शांतवी त्यासि तदीय निम्नता ॥ ३४

जसा नदीचा नगरुद्धमार्गही पंथांतरा काढुनि ओघ चालतो ।
तदीय वक्षांतिल त्यापरी निघे मुखें तयाच्या अतिवृद्ध कोप तो ॥ ३५

खगाधमा ! दुर्गतिमार्गसूचका ! खला ! तुला म्यां नसतां विचारिलें ।
अतर्क्य अश्राव्य अवाच्य जें तुवां मदीय कल्याणमिषें निवेदिलें ॥ ३६

असह्य नीचत्व पदोपदीं असे भरूनिया पूर्ण तयांत राहिलें ।
असा खला निश्चय तूं मनीं करीं तवांसु तणेंचि अजून वांचलें ॥ ३७

असो मला राघवनीति तापदा, धरात्मजेची अथवा विडंबना ।
तरी जनीं रामविनिंदकस्थिती तयाहुनी दे बहुताप मन्मना ॥ ३८

निजेतरस्त्री तितुकी परांगना, परांगना भोग्याचि राजसाकुला ।
अशी असे नीति जरी खला तुझी सदैव होवो लखलाभ ती तुला ॥ ३९

---

१ जखमेनें. २ त्याची गंभीर शांतिही त्या प्रसंगीं त्याचा राग आवरण्याला अगदीं निष्फळ ठरली. ३ वारा जोराचा सुटला म्हणजे समुद्राच्या अगाध खोलीलाही त्याचा क्षोभ आवरतां येत नाहीं. ४ पर्वतानें अडविला आहे मार्ग ज्याचा असा ( ओघ ). ५ अन्यमार्ग. ६ अत्यंत वाढलेला. ७ नरकाची वाट दाखविणाऱ्या ! ८ कल्याणाच्या आविर्भावानें. ९ प्रत्येक अक्षरांत. १० पण हें तूं पक्कें समज कीं, तुझ्या त्या नीचत्वानेंच तुला आतांपर्यंत जिवंत ठेविलें, नीच समजूनच तुला मी आतांपर्यंत बोलूं दिलें. ११ रामाचें आचरण. १२ मानखंडना. १३ रामाच्या निंदकाचें अस्तित्व–जगांत रामाचा निंदक जिवंत आहे, या गोष्टीनें माझ्या मनाला त्याहून अधिक ताप होतो. १४ स्वस्त्रीहून इतर स्त्रिया परांगना ( अर्थात् आई, बहिणी, भावजया यांही परांगनाच ) आणि परांगना तेवढ्या क्षत्रियांना भोग्य, हीच जर तुझी नीति असेल, तर ती तुलाच लखलाभ असो.

परांगना[1]धर्षणवृत्ति जाहले न सूर्यवंशीं अजुनी, न वा पुढें ।
नृपाल होतील, करी भवादृश प्रगल्भचित्त[2]भ्रम केविं बापुडें ॥ ४०
जगत्त्रयीं रामविनिंदकास जें महाजनीं शासन योग्य मानिलें ।
तदीय भोगार्थ म्हणून सिद्ध तूं करीं खगा! निंद्य शरीर आपुलें ॥ ४१
वदून ऐसें वच भक्तराज तो करांत घेई निजसाय[3]कासना ।
दयालुही कोपुनि रामदूषणें प्रवृत्त झाला शुकराजशासना ॥ ४२

( मालिनी वृत्त. )

निशितें[4] शर धनुष्या जोंवरी वीर जोडी ।
त्वरित शुकतनूतें तोंवरी राम सोडी ॥
दृढतर परि[5]रंभीं घेउनी लक्ष्मणाला ।
रघुपति निजचित्तीं हर्षसंपन्न झाला ॥ ४३

( शालिनी वृत्त. )

बंधुश्रेष्ठा हे सख्या एकनिष्ठा ।
माझ्यासाठीं सोशिसी फार कष्टां ॥
रामें ऐशा बोलुनी भाषणाला ।
प्रेमाश्रूंनीं न्हाणिलें लक्ष्मणाला ॥ ४४

---

१ परांगनेचें हरण करण्याकडे आहे प्रवृत्ति ज्यांची असे. २ प्रौढ मनांत मोह उत्पन्न करण्याचें काम ( तुझ्यासारख्या बापड्यानें काय करावें ! ). ३ आपलें धनुष्य. ४ तीक्ष्ण. ५ आलिंगन.

१७

# माधव ज्यूलियन.

यांचें खरें नांव माधव त्र्यंबक पटवर्धन. हे एम्. ए. आहेत. शिक्षण बडोद्यास झालें. कांहीं वर्षें हे पुणें येथील फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर व न्यू स्कुलांत शिक्षक होते. हल्लीं पुण्याच्या म. ए. सोसायटीच्या हायस्कुलांत शिक्षकाचें काम करीत आहेत. यांना फार्शी भाषा उत्तम येते. फार्शी छंदःशास्त्रावर यांनीं एक इंग्रजींत पुस्तकही लिहिलें आहे. जात्या रसिक असून स्वतांची कविताशक्तिही चांगली आहे. विद्याभिरुचिही आहे. वृत्ति आनंदी पण कांहींशी रंगेल. यांची स्फुट कविता बरीच आहे. ती ' मधुमाधव ' या नांवानें एकत्र प्रकाशित केली आहे. ' विरहतरंग ' या नांवाचें एक खंडकाव्यही प्रकाशित झालेलें आहे. शृंगाररसाकडे यांच्या कवितेचा ओढा विशेष दिसतो. काव्यांत फार्शी शब्द विशेष येतात. त्यामुळें तिला क्लिष्टत्व पुष्कळ ठिकाणीं आलेलें आहे.

जन्मसन–१८९४.

---

## आमुची मायबोली.

( सुमंदारमाला. )

मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे ।
नसे बाह्य ऐश्वर्य या माउलीला, यशाची पुढें थोर आशा असे ॥
न मातब्बरी पंचखंडांतरीं ती जरी मान्यता पावली इंग्रजी ।
भिकारीण आई जहाली म्हणूनी कुशीचा तिच्या तीस केवीं त्यजी ॥
जरी मान्यता आज हिंदीस देई उदेलें नवें राष्ट्र हें हिंदवी ।
दिलाचा मराठा मराठीस वंदी हिची जाणुनी योग्यता थोरवी ॥

असो दूर पेशावरीं उत्तरीं तो असो दख्खनीं दूर तंजावरीं ।
मराठीच माझी म्हणे मायबोली प्रतिष्ठापुनी मूर्ति अभ्यंतरीं ॥
मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं ।
सहिष्णुत्व अंगीं पुरें बाणलेलें, हिच्या एक ताटांत आम्ही बसूं ॥
हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं, वसे आमुच्यामात्र हन्मंदिरीं ।
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें, हिला बैसवूं वैभवाचे शिरीं ॥
हिच्या लक्तरांची असे लाज आम्हां, नका फक्त पाहूं हिच्या लक्तरां ।
हिचें कुदरती रूपलावण्य देखा, जयाचा रसज्ञांमधीं अस्करा ॥
न घालूं जरी वाङ्मयांतील उंची हिरेमोतियांचे हिला दागिने ।
मराठी असे आमुची मायबोली, कशाला बढाई, कशाला जिणें ॥
करंटी दरिद्री नसे जन्मतां ही हिची थोर संपत्ति कालोदरीं ।
पचेना, उपेक्षेमुळें राहिलेली, झणीं तीस बाहेर काढूं तरी ॥
कशाला हवी लूट? देतील भाषा जगाच्या हिला ओढती खंडणी ।
मराठी असे आपुली मायबोली ! मराठे झिजूं या हिच्याकारणीं ॥

समाप्त.

REFBK-0003447
REFBK-0003447

१ इच्छा, मनोरथ. २ चिंध्या, फाटकीं वस्त्रें. ३ जातीचें, स्वाभाविक. ४ कीर्ति, प्रसिद्धि.